


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2590

# माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा

REFBK-0024330
REFBK-0024330

हेमंत गोविंद जोगळेकर

संदर्भ काव्य 2590/24330

# माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा

24558

[विडंबनकाव्य संग्रह]

REFBK-0024330
REFBK-0024330



विश्वमोहिनी पुस्तक ९०

# माझा ( पण ) बेहद्द नाममात्र घोडा

विडंबनकवितासंग्रह

हेमंत गोविंद जोगळेकर

चित्रकार : वसंत सरवटे

प्रस्तावना : बाळ गाडगीळ

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मियां ।।

© हेमंत गोविंद जोगळेकर
हेमलता, ९१७/१९ सी
फर्ग्युसन कॉलेज रस्ता
पुणें, ४११ ००४

प्रकाशक :
आनंद अंतरकर
विश्वमोहिनी प्रकाशन
टिळक रस्ता, पुणे, ४११०३०

मुद्रक :
सर्जेराव रा. शेडगे
राहुल मुद्रणालय
कर्वेनगर, पुणे २९.

प्रथमावृत्ती : १५ मे, १९८४

किंमत : १५ रुपये

ह्या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती
मंडळाने अनुदान दिलेले आहे.

ज्यांचे

गाणे धरून माझा
घोडा धरून गेला

त्या
सर्व
कवींस
मन:पूर्वक

# वरातीआधीचं घोडं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2490
दा. क्र.
ग्रंथ (स्थळ प्रत)



श्री. हेमंत जोगळेकर यांचा 'माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा' हा दुसरा कवितासंग्रह. 'होड्या' नावाचा त्यांचा पहिला कवितासंग्रह स्वतंत्र कवितांचा होता. या दुसऱ्या संग्रहातले जोगळेकरांचे तंत्र 'स्व' चेच आहे. पण ते विडंबनात्मक आहे. प्रतिष्ठित मान्यताप्राप्त अशा कवींचे -- खरे म्हणजे त्यांच्या कवितांचे विडंबन हा कवीचा या संग्रहापुरता तरी उद्देश आहे.

'Parody' या इंग्रजी शब्दाला समानार्थी म्हणून आपण जो विडंबन हा शब्द वापरतो, तो विद्वद्‌मान्य असला तरी माझ्यासारख्या अविद्वान माणसाला तो खटकतो. काय असेल ते असो. विडंबन म्हणजे विटंबना असा अर्थ सूचित होतो, निदान ध्वनित होतो. आणि हे काही बरे वाटत नाही. कारण यामुळे विडंबनात्मक लेखनाविषयी व त्यामुळे त्याच्या लेखकाविषयी वाचकाच्या मनात गैरसमज निर्माण होतात. हे काही बरोबर नाही. कारण विडंबनाचा हेतू विटंबना हा तर मुळीच नसतो. नसला पाहिजे. मूळ कलाकृतीमधील एखाद्या विशेषाची नक्कल करताना तो विशेष कसा विसंगत होऊ शकेल हे विडंबन दाखविते. विसंगतीच्या साहाय्याने दोषदिग्दर्शन होत असले तरी तेवढ्याने भागत नाही. या प्रकारातून काही गंमत निर्माण झाली नाही, हास्य फुलले नाही तर मग ते विडंबन कसले? असला व्यापार किंवा कित्येकदा जो अव्यापारेषु व्यापार होतो तो अनेक समीक्षक करीतच असतात. मग झेंडूची फुले कशासाठी?

सारांश काय, की कशाचेही विडंबन करताना – तुम्ही संपूर्ण नवा आशय आणा, वीररसाचा करुणरस करा, शब्दकळेचे अनुकरणही करा – पण या सगळ्यातून विसंगतीचे दर्शन झाले पाहिजे; तशीच गंमत ही हवी. आपल्या लेखनावरील, काव्यावरील विडंबन वाचून कोणी लेखक, कवी, नाटककार सुधारल्याचे मी पाहिलेले नाही. तसे याझ्या ऐकिवातही नाही. अहो, हे कवी, नाटककार, लेखक स्वत:वर भलतेच प्रेम करणारे लोक असतात. एका शब्दात सांगायचे तर ही 'पोचलेली' मंडळी. त्यांना पोचविणारे कोणी विडंबनकार कोण ?

'विडंबनाचा हेतू, कोणा कवीबिवीची किंवा लेखनकामाठी करणाऱ्याची टिंगलटवाळी करणे, त्याची खिल्ली उडविणे हा नसतो; त्याला ओचकारणें, ओरबाडणे हा नसतो' असे काही लोक म्हणतात. या विडंबनकारांवर विश्वास ठेवणे आवश्यक असल्यामुळे तसे धरून चालू. पण प्रत्यक्षात परिणाम काय होतो ? विडंबन विषयाचे जनक चिडतात, रागावतात, प्रसंगी डोक्यात राख घालतात, निदान रुसतात तरी. अशा वेळी 'आम्ही यांना रक्तबंबाळ न करता, त्यांची गुळगुळीत केली' असे म्हणण्यात काय हाशील आहे ? शिवाय काही सुदैवी लोक असे की त्यांनी केलेले विडंबन काही बुजुर्गांना – या ना त्या कारणाने असेल – पण 'निर्विष' वाटते. इतर काहींचे वाटत नाही. 'एखाद्याचे नशीब' असे म्हणायचे. काही लेखक, कवी, नाटककार खिलाडू वृत्तीचे असतात; काही नसतात. आपल्या नशिबी आलेला प्राणी खिलाडू वृत्तीचा आहे म्हणून परमात्म्याचे आभार मानायचे – किंवा नसेल तर त्याला म्हणायचे, 'का रे बाबा असे केलेस ?' — एकंदरीत हा दृष्टीकोनाचा प्रश्न आहे. काही लोक त्यांच्या विडंबनकारांबरोबर चक्क हसताना मी पाहिले आहेत. पोज म्हणून घेतली असली तरी ही वाईट गोष्ट नव्हेच.

विडंबन म्हटले की ते परिणामकारक होण्याच्या दृष्टीने त्यात बरीच आक्रमकता लागते. काहीसा भडकपणा, अतिशयोक्ती, उनोक्ती ह्या गोष्टी त्यात येतातच. थोडेफार विडंबनात्मक लेखन मी केले असल्यामुळे माझी विडंबनाविषयीची भूमिका मी येथे सांगितली. त्या दृष्टीने मी जोगळेकरांच्या या बेहद्द लेखनाकडे पाहिले म्हणजे मला काय जाणवते ? मला असे वाटते की या विडंबनकवितांमध्ये जोगळेकरांनी काही चांगल्या विडंबनकविता लिहिल्या आहेत, तर स्वतंत्र हास्यकविता म्हणून इतर कविता उत्तम आहेत. जोगळेकरांचा 'होडचा' हा संग्रह मी या संग्रहाचे वाचन केल्यानंतर वाचला. तेव्हापासून तर माझा असा ग्रह झालेला आहे की स्वतंत्र कविता हीच जोगळेकरांची ताकद (Forte) आहे. असो. सध्या आपल्यापुढे हा बेहद्द नाममात्र घोडा टापांनी जमीन उकरीत उभा आहे, त्याचे काय ?

आचार्य अत्र्यांच्या 'झेंडूच्या फुलां'नंतर खऱ्या अर्थाने मराठी कवितांच्या विडंबन क्षेत्रात आपल्या टापा टाकणारा जोगळेकरांचा बेहद्द नाममात्र घोडाच

आहे. तसे पाहिले तर जोगळेकरांचे हे विडंबनकाव्य काहीसे धाडसच आहे. आचार्य अत्रे किंवा केशवकुमार यांचे तसे नव्हते. त्यांचे काम सोपे होते. कारण त्यांनी मुख्यत: ज्या रविकिरणांचे विडंबन केले ते कवी सुमार वकुबाचे होते. त्यात मुळी एक रवी आणि बाकीची सगळी किरणे ! जोगळेकरांचे मी धाडस म्हणतो याचे कारण त्यांचे काही कवी तरी मराठीतले मातबर कवी आहेत. त्यांच्या काव्यात ऐकू येणारे कणसूर थोडे आहेत. बरेच सूर सच्चे आणि दमदार आहेत. त्यांचा साचा झालेला नाही. पंथ होणे फार अवघड आहे. त्यांचे विडंबन ही करामत एकंदरीत अवघडच.

अशांपैकी मर्ढेकरांच्या किंवा पु. शि. रेग्यांच्या विडंबनात एखादी छानदार कोपरखळी भेटते. पण बाकीची स्वतंत्र कविता म्हणूनच लक्षात रहाते. विंदा करंदीकर हे त्यामानाने कधी कधी कर्कश, वेगळेपणा हवा म्हणून वेगळे करणारे, धक्क्यासाठी धक्का देणारे कवी. त्यामुळे त्यांच्या कवितेचे विडंबन एकदम सुखावून जाते. एकाच कल्पनेचा काहीसा कंटाळवाणा पाठलाग करणाऱ्या पाडगावकरांच्या ‘सलाम’चे जोगळेकरकृत विडंबन त्यामुळेच रुचकर वाटते. अशा कवितांमधली मूळ कल्पना नवी खरी, पण ती एकदा हाती लागताच काव्यरचनाही यांत्रिक होऊ शकते हे जोगळेकर येथे दाखवितात. ‘भोलानाथ’बरोबरचा मुकाबलाही मजेदार आहे.

यशस्वी विडंबनासाठी हास्यास्पद अशा काही ठळक वृत्ती, प्रवृत्ती, लेखनविशेष हे स्थिर झालेले असावे लागतात. साहजिकच त्यामुळे विडंबनासाठी विशिष्ट प्रवृत्तींच्या (उदाहरणार्थ हळव्या, भावुक) कवींचा गट, किंवा अकारण गाजलेला किंवा गाजवलेला एखादा कवी असावा लागतो. त्याच्या काव्याची शैली वाचकांना बरीच परिचित असावी लागते. विडंबनाच्या रसग्रहणात मूळ लेखनाची आठवण असणे महत्त्वाचे आहे. काही विडंबने एरवीही मजेदार वाटतात. पण ती विडंबने म्हणून नव्हे तर हास्योत्पादक कविता म्हणून. या दृष्टीने पहाता जोगळेकरांनी स्वत:वर फार मर्यादा घालून घेतल्या आहेत किंवा त्या त्यांच्यावर पडल्या आहेत असे वाटत रहाते. एकेका कवीची – तोही कित्येकदा (किंवा ती ही) फारसा ज्ञात नसलेला – त्याची एखादीच कविता निवडून त्यांनी त्यांची विडंबने केलेली आहेत (उदाहरणार्थ यशोधरा साठे, ॲग्नेस). त्यामुळे खास वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या ग्रेस किंवा अरुण कोलटकर अशांच्या कवितांची विडंबने बाजी मारून जातात. इतरांच्या बाबतीत त्यांच्या मूळ कविता माहीत नसल्यामुळे त्यातील विडंबनाची खुमारी समजून येत नाही. पण तरीही त्या स्वतंत्र कविता म्हणून वाचनीय वाटतातच. तो तर मुळी जोगळेकरांच्या एकंदर कवितेचाच गुण आहे.

मला असे वाटते की स्वत:च्या प्रत्येक विडंबन कवितेबरोबर मूळ कवीची कविता छापता आली असती तर अभ्यासासाठीच नव्हे, तर रसग्रहणासाठीसुद्धा

ते चांगले झाले असते. ते न करता आल्यामुळे, जोगळेकरांना वारंवार आपल्या 'अंत:प्रेरणेंकडे' धाव घ्यावी लागली आहे. पण हा अंत:प्रेरणेचा धागा मूळ कवितेचा संदर्भ देण्याबरोबर कधीकधी समीक्षेचेही विडंबन साधून जातो.

जोगळेकरांच्या या विडंबनाकडे म्हणून आता मूळ कवितांतील काही संदर्भांच्या साहाय्याने मी पहायचे ठरविले आहे.

ज्या कवितेचे शीर्षक जोगळेकरांनी या संग्रहाच्या नामकरणासाठी योजले आहे ती त्यांची विडंबनकविता 'नामी' आहे

तो उठतो खिकाळत वेळी अवेळी
आणि त्याच्या पाषाणशिल्पाइतक्या
अलिप्त काळ्याथंड प्रशस्त नाकपुड्यांतून
निघालेली फुंकर माझ्या दैनंदिन
उकळत्या कढईतून कोरते
शीतल आरामदेह स्विमिंग पूल.
मग तो लगेच गुल होतो गोळा करायला
बिकिनीधारी बायका लोळत ठेवायला
आजूबाजूस चित्राचा एकूण तोल सांभाळायला
न पोहणाऱ्या.

अरुण कोलटकरांचा घोडा कुठल्या नवयुगाच्या अश्वमेधाचा आहे काय? असेल. त्यांच्या वणवा... भाकरतुकडा .. दहशतवादी... अर्थव्यवस्थेचे डोंगर... सिंहासन... उधळलेली नाणी... यांवरून तसे वाटते. पण जोगळेकरांचे भीमथडी तट्टूही काही कमी नाही. त्याच्या ओवीबद्ध टापांचे बोलही 'खणखणीत' आहेत. त्याच्या यमक्या टापांचे कथनकौशल्यही लयदार आहे. फक्त तो कुत्र्यासारखा शेर होऊन साहेबावर गुरगुरतो.

'आहेत का
माझ्या शेपटीत आहेत तितके तरी केस
तुमच्या आख्ख्या टकलावर मिळून ?'

आणि मग तो कोलटकरांच्या श्यामकर्णाप्रमाणे कसली नाणीबिणी उधळत नाही, तर नदीवर तोंड धुण्यासाठी जातो!

आपल्या कवितेच्या विडंबनाने कवी प्रसन्न होत असतील तर कोलटकरांनी या कवितेवर प्रसन्न व्हायला हरकत नाही. निदान 'एखादी तरी स्मितरेषा!'

किंवा आपल्याला संलग्न प्रतिमांच्या निबिड जंगलात नेणाऱ्या ग्रेसफुल 'जिवाची वैष्णवी' या कवितेचे विडंबन पहा.

मी पुरुष असतानाही
शांपुलेस माझे केस
ओंजळीत बेसिन धरते
तो अवघडलेला फेस

...

...

भिंतीवर लटके चित्र
चित्रात चर्चच्या घंटा
ज्या नादाविण किणकिणल्या
फिरता माने वर'वंटा

...

...

मी अमूर्त तो पाषाण
लेण्यात उतरला खाली
छिनलेल्या मम केसांची
वेगाने कमळे झाली

आपल्या कवितेत ग्रेस जो मूड निर्माण करीत आहेत त्यापेक्षा हा किती वेगळा आहे ! पण तो निर्माण करण्यासाठीसुद्धा कल्पनेची किमया काही कमी चालते असे नाही.

यशोधरा साठ्यांची 'लिलाव' ही कविता पहा. जोगळेकरांनी पुकारल्यामुळे तिचे 'छत्रीचे कमळ' होते.

हातात छत्रीचे कमळ मिरवीत आम्ही चालणार आहोत
पावसाचा अर्थ विचारीत आल्यागेल्याला.
तुमची छत्री चोरीला गेली ? – हरकत नाही !
आमची छत्री तरी आमची कुठे आहे ?

मूळ कविता अशी आहे :

आकाशाचे फूल हातात मिरवीत आम्ही चालणार आहोत
पावसाचा अर्थ विचारीत आल्यागेल्याला.
तुमचे झरे सुकून गेले ? – हरकत नाही.
आमच्या सुखाचा कालच लिलाव झाला आहे.

–डावे उजवे आपण ठरवायचे आहे.

ॲग्नेस यांची मूळ कविता ' किरमिजी घन ' मी नंतरच वाचली.

आसमंता लागे निळाकाळा ध्यास
सोनेरी आरास मालवली

धूसरली आता धनगरवाडी
टेकडची घडी पेंगुळली

अशी अभंगरूप पावलेली ही हुरहूर आहे. जोगळेकरांच्या हातात ती अभंगच राहते पण तिचे नवे रूप कसे आहे ? फक्त आसमंताऐवजी घरादाराला ' घननीळ ' ध्यास लागतो. आणि होते काय ? तर –

थंडावली आता हिरवी शेगडी
कढई बापडी दूर उभी

ओठात घुमेना कुकरच्या शीळ
गॅस घननीळ भेटवा गा

ॲग्नेसच्या मूळ कवितेतील ध्यास सच्चा वाटतो. त्यात विडंबन करण्यासारखे फारसे काही नाही. तरीही जोगळेकरांची ' थंडावलेली हिरवी शेगडी ', ' कुकरची शीळ ', ' घननीळ गॅस ' आपल्याला सुखावून जातात. जोगळेकरांनी स्वतंत्र हसऱ्या कविताही लिहाव्या असे म्हणूनच सुचवावेसे वाटते.

विडंबनकाराने स्वतःलाही जरा हसायला शिकावे असे म्हणतात. जोगळेकर हे फक्त मान्य करून थांबलेले नाहीत.

' कुर्र ' नावाची त्यांची स्वतंत्र कविता आहे.

बाहेर जेव्हा पाऊस
पानापानाने भिजत होता
मी त्याला पाहिला
—छोटयाश्शा पानावर बसून बासरी वाजवताना.

चालता चालता जेव्हा
मी वरच्या झाडीतून
आकाशाकडे पाहिले
तो माझ्याकडे बघून हसला
किरणांना धरून सुर्रकन् घसरताना.

ओळीमागून ओळी
पानांमागून पाने
मी जेव्हा धावत चाललो होतो.
मी त्याला ऐकला
माझ्याच कानात बसून कुर्र करताना.

आपल्या विडंबनकवितांसाठी 'कवितांपलिकडच्या कविता' असे फार सुंदर नाव जोगळेकरांना सुचले होते. आपल्या 'कुर्र' या कवितेपलिकडे जोगळेकरांना कोणती कविता दिसते ?

बाहेर जेव्हा पाऊस
छत्रीछत्रीने भिजत होता
तेव्हा तो चालत आला
— माझ्याच छत्रीतून.

भिजलेला शर्ट
जेव्हा मी काढला
तो बाहेर आला
— माझ्याच शर्टातून.

तोंडावर फेस फासून
दाढी करता करता
जेव्हा मी समोर पाहिले
त्याने मला वेडावून दाखविले
-- डाव्या हाताने सेफ्टी रेझर चालवून !

थोडक्यात काय की डाव्या हाताने लेखणी चालवूनही स्वतःचीच केलेली गंमत जोगळेकरांना येथे गुळगुळीत जमली आहे.

मी अगोदरच म्हटल्याप्रमाणे 'होड्या' हा कवितासंग्रह लिहिणारे जोगळेकर स्वतः दर्जेदार कवी आहेत. त्यांच्या कविता वाचून विजयाबाईंना बालकवी, मर्ढेकर, पु. शि. रेगे यांच्यासारख्या भल्याभल्यांची आठवण व्हावी असली किमया त्यांच्या पहिल्यावहिल्या संग्रहातच आहे. कदाचित त्यांच्या या मूळच्याच कविमनामुळे असेल, जोगळेकरांचे विडंबन सूक्ष्म, सौम्य आणि अनाक्रमक आहे. अतिशयोक्ती त्यात आढळणार नाही. मनात आणते तर र. कृ. जोशींच्या आकडे-चित्रांची, अक्षरवळणांची खूप गंमत त्यांना करता आली असती.

पण तरीही या संग्रहातील बहुतेक कविता, मूळ संदर्भाशिवायही मजेदार का वाटतात ? त्यातून जोगळेकरांची कल्पनेची चमक, हास्य निर्मिणारी खोचक दृष्टी दिसते म्हणून. या कवितांना विडंबनकविता हे वर्गीकरण देता येणार नाही की विडंबनकवितेची आणखी व्यापक सैल व्याख्या करणे आवश्यक आहे ? कदाचित असे ही म्हणता येईल की काही विशिष्ट प्रवृत्ती, दोष इत्यादी व्यक्त होणाऱ्या कवितांचे त्यांनी जसे विडंबन करायला पाहिजे, काही विशेष -- जे म्हणजेंच काव्य अशी समजूत बळावत असते -- ते कसे हास्यास्पद बनू शकतात हे जसे दाखवायला पाहिजे, तसेच केवळ स्वतःच्याच स्वतंत्र अशा हसऱ्या कविता फुलविण्याचेही त्यांनी मनावर घ्यावे.

कलावंताची कुंडली कोणी मांडण्याच्या फंदात पडू नये असे मर्ढेकरांनी म्हटले आहे खरे. पण या जोगळेकरांच्या बाबतीत मला असे वाटते की सर्व मार्ग व्यवस्थित सुचविणारा बुध त्यांच्या कुंडलीत योग्य त्या ठिकाणीच पडला असला पाहिजे. हसऱ्या, हसविणाऱ्या, हुरहूर लावणाऱ्या, कधी खिन्न करणाऱ्यासुद्धा 'अनेकानेक' कविता जोगळेकर यापुढे लिहीत राहणार हे भविष्य सांगण्यासाठी कुठल्याही आरशाची आवश्यकता आहेच कुठे ? 'नाममात्र घोडा' आणि 'होड्या' दोन्हीही अशा अनेक काकणांनी सजलेले आहेत. (ही आपली आमची(ही) एक मिश्र प्रतिमा बरे ! ).

--बाळ गाडगीळ

# माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९०
दा. क्र. २७३३०
काव्य २५५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)





# उपोद्घात

माझी पहिली कविता लिहून झाल्यावर, मी तिची होण्याची ती पहिलीच वेळ आहे अशी तिची मुळीच गय केली नव्हती. ताबडतोब तिला घेऊन एका प्रख्यात मासिकाच्या विख्यात कार्यकारी संपादकांपुढे हजर झालो होतो. तेव्हा संपादक-महाशयांनी आपल्या जाड भिंगांच्या चष्म्यावरून माझ्याकडे आणि चष्म्यातून तिच्याकडे अशी एकेक नजर टाकली. मग चष्मा काढून माझ्या शर्टाच्या मधल्या गुंडीकडे पहात ते म्हणाले, " हे पहा -- काय आपलं ते -- कवीची एकच कविता वाचून, ती कविता काय किंवा कवी काय -- कळून येत नाही. तुम्ही तुमच्या कवितांचासंपूर्ण ' बंच'च पाठवून द्या एकदा. सवडीनं." एवढं बोलून त्यांनी आपली नजर दुसरीकडे वळविली. तेव्हा मी तसाच हातातला कागद हलवीत परत आलो. पण चिकाटी सोडली नाही. हळूहळू एकेक कविता लिहीत ' बंच ' पुरा केला आणि तडक उपरिनिर्दिष्ट संपादकमजकुरांकडे गेलो. ह्यावेळी त्यांनी तो बंच घेऊन, आपला चष्मा डोळ्यांवरून काढून त्यावर पेपरवेटसारखा ठेवला. माझ्या शर्टाच्या वरून पहिल्या गुंडीकडे पहात ते म्हणाले, " बघेन. वाचून. सवडीनं. कळवीन."



त्यांना दोनतीन महिन्यांची सवड दिल्यानंतर मी पुन्हा त्यांच्या कचेरीत ' दि जज्‌मेंट'साठी हजर झालो. माझे नाव, गाव, काम सांगितल्यावर लवकरच संपादकमहाराजांना माझा ' बंच ' सापडला. माझा ' बंच ' टेबलावर उलगडून आणि टेबलाखालील खणात आपला जेवणाचा डबा उघडून त्यांनी माझ्यासमोर एकाच वेळी दोहोंचा समाचार घेण्यास सुरुवात केली. दोन्हीही संपताच संपादकमहोदयांनी एक अर्थपूर्ण विराम घेतला आणि मग ते थेट आपल्या चष्म्यातून माझ्या चष्म्यात पहात म्हणाले, " काय हो, ह्या कविता ? यांना काही संस्कारच नाहीत. तुम्ही इतर कवींच्या कविता वाचता की नाही ? तुम्ही असं करा. मर्ढेकरांपासून आजकालच्या कवींपर्यंत सर्वांच्या कविता आधी वाचा. आणि मगच स्वतः लिहा. म्हणजे त्यांचं अनुकरण करा असं नाही. ' अंतःप्रेरणा ' तुमचीच हवी. पण चांगल्या अभिव्यक्तीसाठी संस्कार हवेत. कवितेलाच संस्कार नसतील तर ती संस्कार कशी करणार ? अं ?" एवढे बोलून त्यांनी माझा ' बंच ' परत दिला.

एवढे झाल्यावर, माझ्या जागी दुसरा कोणी असता तर तो नक्कीच नाउमेद झाला असता. पण मी पडलो मी ! मी तातडीने मिळतील तेथून, मिळतील तसे काव्यसंग्रह, नियतकालिके, अनियतकलिके, हस्तलिखिते जमवीत गेलो. आणि टेबलावर ठेवलेल्या माझ्या कवितेच्या ' बंच'वरच त्यांचा एक ढीग रचला.



मोठ्या धैर्याने मी त्या ढिगाचा फडशा पाडण्यास सुरुवात केली. पण माझ्यातल्या कवीची संवेदनशीलता इतकी तरल, की वाचलेली प्रत्येक कविता माझ्यावर संस्कार करून मला नवीन कविता रचण्यास उद्युक्त करू लागली. माझ्या प्रतिभेचा घोडा चौखुर उधळू लागला. परंतु मी कागद, शाई, वेळ इत्यादींचा विचार करून त्यांतल्या मोजक्याच कविता, अंत:प्रेरणेला भावल्या त्या क्रमाने कागदावर उतरवल्या.

ह्या कवितांचा 'बंच' तयार झाल्यावर तो घेऊन आधी उल्लेखिलेल्या संपादकांकडे जाण्याची चूक मी केली नाही. कारण एव्हाना संस्कारित झालेल्या माझ्या अंत:प्रेरणेने प्रस्तुत ' बंच ' म्हणजे आधुनिक मराठी कवींच्या संस्काराचा आढावा घेण्याचे ऐतिहासिक कार्य असल्याचे मला सांगितलं. म्हणून ते नम्रपणे, सटीक ग्रंथरूपाने मी चिकित्सक वाचकांपुढे ठेवीत आहे.

धैर्य दे अन् सहनशक्ती
फक्त इतुकी याचना
वाचकां हे वाचण्या अन्
वाचुनी ही वाचण्या



## एक

तशी मराठी कवींची परंपरा ज्ञानेश्वरांपासूनची आहे. परंतु ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या कवींचा आढावा काव्यविचार–काव्यप्रसार– आणि काव्यवाचन यांना वाहिलेल्या पाडगावकर–बापट – करंदीकर या त्रयीने महाराष्ट्रात जागोजाग काव्यदर्शनाचे कार्यक्रम करून घेऊन टाकला होता. तेव्हा मी मर्ढेकरांपासून सुरुवात केली हे ठीकच झाले. तशा मर्ढेकरांच्या जीवनविषयक —म्हणजे उंदीर, मुंग्या, किडे, जंतू इत्यादींबद्दलच्या कवितांचे संस्कार नंतर वेगवेगळ्या कवींनी आपल्या कवितांतून दाखविले आहेत. परंतु त्यांच्या निर्मितीविषयक कवितांचे संस्कार मात्र तितकेसे झालेले दिसत नाहीत. माझ्या निर्मितीक्षम अंत:प्रेरणेवर मात्र त्यांच्या निर्मितीविषयक कवितांचा लगेच परिणाम झाला. त्यातून माझ्या अर्थशास्त्राच्या (शंभर मार्कांच्या) पार्श्वभूमीमुळे मला निर्मितीनंतरची 'पायरी,' 'विक्री' असते हे माहीत होते. त्यामुळे मर्ढेकरांच्या 'असे काहीतरी व्हावे' ह्या निर्मितीविषयक कवितेच्या संस्काराने मला प्रस्तुत विक्रीविषयक कविता सुचली. मर्ढेकरांची एकेक कविता कशी एकेका बुलेटसारखी आहे, असे 'त्यांचे मित्र' प्रभाकर पाध्ये म्हणतात. त्यांच्या कवितेच्या संस्काराने स्फुरलेली ही अशी काहीतरी कविता कशी एखाद्या 'एक्सपोर्ट क्वालिटी' 'हापूस'च्या आंब्यासारखी रसपूर्ण आणि आशयघन झाली आहे.

असें कांहीं तरी व्हावें
अशी दाट होती इच्छा ;
असें कांहीं तरी झालें
पुरवितें तेंच पिच्छा

ऐलथडी पिके आंबा
पैलथडीला दुकान ;
कुण्या डॉलरवंतासाठीं
मध्यें वाकतें विमान.

हवाबंद शीतपेटी
वर येई ना सुवास;
तरी खिशांतील नोटा
देती आळस, सुहास.





असें कांहींसें होईल
अशी फार होती आशा ;
असें कांहींसें होतांच
गुंडाळावा का हो गाशा ?

## दोन

मर्ढेकरांनंतर कोण हा प्रश्न पाडगावकर–बापट–करंदीकर या त्रयीने उरूच दिला नव्हता. ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या कवींच्या कविता ‘काव्य-दर्शनां’त वाचून दाखविल्यावर ह्या कवींनी आपापल्या कविता वाचून, मर्ढेकरांनंतर आपणच हे केव्हाच प्रस्थापित करून टाकले होते. हे तिघे एकत्रितपणे कविता वाचीत असल्यामुळेच की काय, माझ्या अंत:प्रेरणेवरही त्यांचा एकत्रित असा संस्कार होऊन मला धक्काच बसला. त्यातला पहिला धक्का पहिलेवहिले – पणाचे वर्णन करणाऱ्या पाडगावकरांच्या ‘उत्सव’ ह्या कवितेचे संस्कार घेऊन आल्यामुळे धक्क्यासारखा धक्कादायक अनुभवही किती हळुवार आणि लयदार झाला आहे पहा.

पहिला धक्का

तो पहिलावहिला
धक्का धडधडता ...

ती गर्दीच्या गाभ्यात भेटली
चित्तवेधुली काया ...

ती क्षणार्ध उर्मी
धट्ट धिटाई
चोख समयदारी
ते " उई ऽऽ " झिणझिण्या ...

दक्ष पलायनकारी
रेंगाळशहारे ... कृतनिवले अंतर
अन् पापभावना गोंजारित नंतर
तो पहिलावहिला धक्का माझा मला !



## तीन

प्रथेप्रमाणे ह्या पहिल्या धक्क्यानंतर, वसंत बापटांनी मला दुसरा धक्का द्यायला हवा होता. पण दुसऱ्या क्रमांकाचे नाव निघताच पु. शि. रेगे यांचे दुसरेपणावरील प्रेम धावून आले. बापटांना बाजूस सारून रेग्यांच्या 'दुसऱ्या पक्ष्या'ने

संस्कारित केलेला हा दुसरा धक्का किती अर्थघन आणि तत्त्वज्ञानगर्भ झाला आहे पहा :

### दुसरा धक्का

धक्का जो अंगाला धक्का देतो
आहे अंगच दुसरे पुन्हा त्या धक्क्यात
धक्का जे अंगाला देतो,

अंगाला जो धक्का धक्का देतो
आहे धक्काच दुसरा धक्क्यातच त्या पुन्हा
अंगाला जो धक्का देतो.



# चार

अशा रीतीने बापटांना खो देऊन रेग्यांच्या कवितेने मध्येच माझ्यावर संस्कार केले. पण विंदा करंदीकर मात्र आपल्या जन्मजात कोकणी (" यांत कोंकण कुठें आलें हो ? सगळे आपले तिथें भिडवतां म्हणजे काय ?") खंबीरपणाने आपल्या जागेस चिकटून राहिले. आणीबाणीत झिरपलेल्या त्यांच्या 'खरा प्रकार' या विरूपिकेच्या संस्कारामुळे ह्या 'तिसऱ्या धक्क्यात' एकाच अनुभवाचे किती विविध 'पदर' आणि शक्यता निर्माण झाल्या आहेत पहा :

## तिसरा धक्का

'त्यांनी धक्का दिला म्हणून तिने पातळ सोडले'
अशी त्याने कविता लिहिली.

वाचकांच्या पत्रव्यवहारात :
पहिला वाचक : 'हे अश्लील आहे'
दुसरा वाचक : 'ही काय कविता झाली ?'
तिसऱ्या वाचकाला एवढा धक्का बसला
की तो काही म्हणालाच नाही.

पहिला टीकाकार : 'संवेदनास्वभाग प्रगल्भ आशयगर्भ'
दुसरा टीकाकार : 'सोशीक अभिव्यक्तीचे सहजसिद्ध स्वरूप'
तिसरा टीकाकार : (स्वगत)
'लिहायचं तर 'तेव्हाच' लिहायचं
आता त्याचा संदर्भ काय ?'

तू म्हणालीस, " संबंध काय ?"
मी म्हणालो, " करणार काय ?"
'तो' म्हणाला, " वाचणारा
वाचून वाचून 'वाचणार' काय ?"
खरा प्रकार एवढाच झाला.

# पाच

आपली नेहमीची जागा गेल्याने खट्टू झालेल्या वसंत बापटांनी मला धक्का दिलाच नाही. पण त्यांनी मला तसेच सोडले नाही. त्यांनी मला 'एका कुमाराची कहाणी' ऐकविली. तिच्या संस्काराने स्फुरलेली ही कथनपर कविता :

## एका सुमाराची कहाणी

सकाळच्या चहासरशी एकदा याने काय केले
एक पूर्णांक दोन दशांश स्निग्धांशाचे दुग्ध रिचविले.
टिंबाटिंबामध्ये जसे टिंब आणखी एक द्यावे
लोंबकळलेल्या लोकलमध्ये अंग आपले झोकून दिले
डब्यामध्ये कुणी उगाच अंगाशी सलगी केली ...
तशी हा सावध झाला
खिसापाकिट सांभाळीत, स्टेशन आले उतरून गेला.

साहेबासन्मुख कारकून मान मोडून काम करतो
फायलीवरती पेन रोखून कागदामागून कागद उलटतो
तसा हाही इमानदार उग्र एकाग्र झाला
तेव्हा म्हणे साहेबाने यास अमक्याचे तमके पुसले
तशी हा जो तडक उठला
फायलींच्या जंगलामध्ये धाय धाय धावत सुटला.

घड्याळाने दोन्ही हात लांबवून जेव्हा आळस दिला
"सहा वाजले" असे म्हणत औडक चौडक दौडत गेला
लोकलमध्ये कुणीतरी पायावरती पाय दिला
तेव्हा म्हणे याच्या डाव्या चपलेचा बंद तुटला ...
तशी याने काय केले,
चप्पल आणि पायाला रुमालाने बांधून टाकले.

चार हात बिऱ्हाडात घुम्म होऊन घुमत राहिला
जेवण झाल्यावर बाहेर गॅलरीत आडवा झाला
मुख्य चित्रपटाआधी जाहिराती, डॉक्युमेंटरी
छोटी छोटी स्वप्ने तशी तेव्हा याने पाहून घेतली
पोरेबाळे झोपून जेव्हा आतमध्ये सामसूम झाले
तसा हा जागा झाला,
' तहान लागली ' असे म्हणत तडक आतमध्ये गेला
कोटाच्या आतल्या खिशातले पिवळे पाकिट चाचपून पाहिले
जेव्हा याची खात्री पटली, तेव्हाच मणक्यातून सणक उठली
बायको आणि बाज दोघी एकदमच जरा कुरकुरल्या.

दहा मिटांत गॅलरीत गडी झाला डाराडुरू
इंटर्व्हलनंतर पुन्हा मुख्य चित्रपट झाला सुरू
चित्रपट तोच जुना, लोकल आणि ऑफिस पुन्हा
फार तर स्वप्नामध्येच हुरहुरतो कधीमधी
" सी डी एस् चा पुढचा हप्ता मिळणार तरी आहे कधी ?"



## सहा

आपल्या काव्यदर्शनाच्या कार्यक्रमात पाडगावकर–बापट–करंदीकर हे एकामागून एक पुन्हापुन्हा आपल्या कविता म्हणत असल्याने बापटांच्या कवितेनंतर पुन्हा विंदा करंदीकरांची कविता माझ्यावर संस्कार करण्यास आली. त्यांच्या ' ते ' कवितेत

' ते होते फक्त तुझ्याशी
ते मवाळ आणि मवाली
देहाच्या थोडे वरती
आत्म्याच्या थोडे खाली '

ह्या ' ते'च्या संस्काराने माझ्या अंतःप्रेरणेस स्फुरलेले ' ते ' कवितासारखे कवितेहून.

### ते

ते होते ओठांवरती
पण नव्हते ओठांमधले
म्हणुनीच चुंबता तुजला
ते गेले थोडे पुसले.

ते होते तव केसांशी
पण नव्हते ते केसांते
म्हणुनीच न मजला कळले
ते किती लांब किति कोते.

ते होते तव वक्षांशी
पण नव्हते ते तव वक्ष
म्हणुनीच न मजला कळले
गेले जरि तिकडे लक्ष.

ते उन्नत अन् झुकलेले
ते खोटे तरीही असली
देहाच्या थोडे वरती
कपड्यांच्या थोडे खाली



## सात

करंदीकरांच्या कवितेनंतर सवयीने. पाडगावकरांची वेगवेगळ्या संमेलनात, काव्यवाचनांत नियमित येणारी कविता वारंवार लांबलचक सलाम करू लागली. तिच्या संस्कारांमुळे माझ्या अंत:प्रेरणेने केलेला हा सलाम पाडगावकरांच्या प्रभावामुळे कसा उपरोध-सागरात गटांगळ्या खात आहे पहा :

## सलाम, नोव्हेंबर ७७, मुक्काम फुलेनगर

सलाम,
सबको सलाम.
लाखों खर्चून बांधलेल्या मंडपास सलाम,
फुले मंडपातल्या मंडईस सलाम,
मंडईतल्या दर्दी गर्दीला सलाम,
स्वागताध्यक्षांच्या सर्दीला सलाम,
दुर्गाबाईंच्या मर्जीला सलाम,
समजूत काढायला मुंबईला जाता जाता
पुण्यातच राहिलेल्या स्वागतसमितीच्या
पदाधिकाऱ्यांना सलाम,
सलाम प्यारे भाईयों और बहनों
सबको सलाम.

अध्यक्षांच्या निवडणुकीस सलाम,
'सर्व' झिंदाबादीस सलाम,
अभिनंदन-सत्कार-सभांस सलाम,
मनोहर मुलाखतींना सलाम,
मुलाखतींच्या इन्कारांना सलाम,
इन्कारांस दिलेल्या आव्हानाला सलाम,
आव्हानास दिलेल्या प्रतिआव्हानाला सलाम
प्रति आव्हानाला ........................................................
सलाम,
अध्यक्षांनी मारलेल्या 'डोंबिवंत' डासांना सलाम,
सबको सलाम.

बरोब्बर सहाला फुंकलेल्या यथार्थ शिंगाला सलाम,
कृतार्थ सरस्वतीस्तवनाला सलाम,
दुर्गाबाईंच्या एंट्रीलाच पैसे वसूल सलाम,
जाहीर खरडपट्टीस कपाळाला हात लावून सलाम,
भांबावलेल्या 'भावेसाहेबांनी' केलेल्या
हस्तांदोलनास सलाम,
दुर्गाबाईंनी नाकारलेल्या हारतुऱ्यांस सलाम,
त्यानंतरही ठणकावून बोलणाऱ्या शशिकलाताईंना सलाम,
अध्यक्षीय भकास भाषणाला सलाम,
रामाला सलाम, कृष्णाला सलाम,
बॉश घेऊन फ्रेश होणारीस सलाम,
हर एक जमुहाईको सलाम.

कार्यकारिणीच्या बंद बैठकीस बेहद्द सलाम,
आणीबाणीदुर्गेच्या अभिनंदनास सलाम,
गदिमा, ठोकळांच्या अपमानाच्या निषेधाला सलाम,
अपमान गिळू पहाणाऱ्या ठोकळांना सलाम,
ठोकळांच्या मोठेपणाचे अभिनंदन करणाऱ्यांना सलाम,
मोठेपणा दाखवल्याचा निषेध करणाऱ्यांना सलाम,
'पळपुटेपणा काय कामाचा' म्हणणाऱ्यांना सलाम,
'हलकट वर्तनाच्या' धिक्कारास सलाम,
त्यावर उठलेल्या गदारोळास सलाम,
महाअध्यक्षांनी आपटलेल्या काठीस सलाम,
'ठराव मागे घेतो' म्हणणाऱ्यांना सलाम,
'मागे घेता येणार नाही' म्हणणाऱ्यांना सलाम,
दुर्गाबाईंच्या पत्रक छपाईच्या खर्चास सलाम,
खर्च काढणाऱ्या पदाधिकाऱ्यांस सलाम,
परत केलेल्या पाचशे रुपयांस सलाम,
एकूणच सर्व 'प्रश्न तत्त्वाचा आहे'
म्हणणाऱ्या तत्त्वनिष्ठांना सलाम,
सलाम प्यारे भाईयों, सबको सलाम,

व्यासपीठावर चालूच चर्चांना सलाम, –चर्वणाला सलाम,
पु. लं.च्या तयार किश्श्यांना सलाम,
जेवणघरातल्या रश्श्याला सलाम,
नव्यांच्या ओळखीपाळखींना सलाम,
जुन्याच्या उखाळ्यापाखाळ्यांना सलाम,
गर्दीत हरवलेल्या, उमेदवार खांद्यांवरल्या
शबनम पिशव्यांत पडून राहिलेल्या
चुपचाप चुपचाप कवितांना सलाम,
सलाम मेरे यारों, सबको सलाम.
उमाप कविसंमेलनाला सलाम,
ज्येष्ठांच्या 'नेहमीच्याच यशस्वींना' सलाम,
अमक्यातमक्यांच्या पुतणीस सलाम,
तमक्याअमक्यांच्या पणतीस सलाम,
पिवळ्याधम्म गोजिरवाण्या कहाण्यांना सलाम,
जयप्रकाशांच्या झिंदाबादीस सलाम, पत्रकांस सलाम,
दलित पँथरच्या हमल्यास सलाम,
सलाम प्यारे दलितों और पँथरों, सबको सलाम.

खुल्या अधिवेशनाच्या कुजबुजभरल्या सुरुवातीस सलाम,
मधमाशी दाढीच्या, नाना कळांच्या, अनंत भाव्यांच्या
खुल्या ठरावाच्या पत्रकांना सलाम,
त्याला अनुमोदणाऱ्या अनेकांना सलाम,
एकदम उसळलेल्या गर्दीस सलाम,
पायात नसलेल्या पायपोसास सलाम,
एका प्रचंड गोंधळाला सलाम,
परिस्थिती आटोक्यात आणू पहाणाऱ्या
पु. लं.च्या आवाहनास मान देऊन
ताबडतोब शांतपणे निघून जाणाऱ्या
पोलिसांना सलामच सलाम,
पत्रकारांच्या धावपळीस सलाम,
युक्रांद दलित पँथरला सलाम,

ठोकळांनी मागितलेल्या माफीस सलाम,
कार्यकारिणीच्या मागे घेतलेल्या ठरावास सलाम,
तरीही चालूच गोंधळाला सलाम, निदर्शकांना सलाम,
गोंधळ पहाणाऱ्या हजारोंच्या संख्येतल्या
तिकिटधारी प्रेक्षकांना सलाम,
संमेलन बरखास्त करणाऱ्या अध्यक्षांना सलाम,
मध्यरात्रीनंतर केलेल्या निर्भय अध्यक्षीय समारोपास सलाम,
आफ्टर ऑल, निमंत्रित साहित्यिकांस मिळालेल्या
मानधनाच्या चेक्सना सलाम,
सलाम प्यारे भाईयों और बेहनों सबको सलाम.

अनेक हात उगवले असते तर
अनेक हातांनी केला असता सलाम,
लेकिन माफ करना भाईयों
हात तर दोनच आहेत
आणि उजवा हात पापड खाण्यात गुंतला आहे
म्हणून फक्त डाव्या हाताने सलाम,
सलाम मेरे अझीझ दोस्तों, सबको सलाम.



# आठ

पाडगावकरांचे संस्कार इतके लांबल्याने वसंत बापट अस्वस्थपणे आपली पाळी येण्याची वाट पहात असताना, पुन्हा ‘दुसऱ्यांदा’ पु. शि. रेग्यांची कविता मध्ये घुसून आपले संस्कार करून गेली.

‘अहो, आमचं घर पहा
ही वाऱ्याची खोली ... ’

या रेग्यांच्या कवितेच्या संस्काराने स्फुरलेली कविता कशी रेग्यांच्या कवितेसारखीच अल्पाक्षर साक्षेपी झाली आहे अहो, आमची कविता पहा :

अहो, आमचं ऑफिस पहा :
ही साहेबांची खोली;
दाराच्या फटीतून
जे रंगीबेरंगी दिसताहेत धागे
ती आहे सेक्रेटरी.

आमचे खरे साहेब
आहेत मागे
तिच्या.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९०
दा. क्र. 20330
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

आधीच पाडगावकरांचे संस्कार लांबलेले, त्यात पु. शि. रेग्यांची कविता मध्य घुसलेली; त्यामुळे रागावलेले वसंत बापट आपली आख्खी मालिका-कविता घेऊनच माझ्यावर संस्कार करायला आले. त्यांच्या 'मानसी'च्या संस्कारांनंतर, माझ्या मानसातून शब्दरूप घेऊन आलेले हे माझ्या मानसीचे रौद्ररूप. बापटांच्या मानसीप्रमाणे माझ्या ह्या सर्व तुकड्यांचे स्फुरणही अविच्छिन्न आणि एकबीज आहे.

त् त् तशा सगळ्याच कविता ह्या तिच्यामुळे
त् त्या तिच्यासाठी नसल्या तरीही.
आयुष्यच सारे तिला घाबरण्यात गेलेले
तर काय नवल
फुटणारे सगळेच शब्द तिने थर्कापलेले.

या साऱ्या कविता तर तिच्याच
काही : तिच्या खणखणीत हाकेसरशी
गडबडून दिलेल्या ओ सारख्या.
काही : मूक आक्रोश
काही : वेदनांची गाणी
थेट कपाळावरच्या टेंगळापासून निघालेली.
आणि ह्या बहुधा शेवटच्या कैफियती.

टीकाकार हो,
माफ करा या कवितांना
त्या तुम्हाला माझ्या खाजगी वाटल्या तर.
माफ करा शक्य तर मलाही
त्या वाचताना
तुम्ही अस्वस्थ झालात तर
त्या 'तुमच्याच' खाजगी वाटून.

०००

सजवलेल्या मोटारीत माझ्या शेजारी
खाली मान घालून मिरवीत आली.
बँडवाले वाजवीत होते
'हम आज अपने मौतका सामान ले चले'
तेव्हा कळले नाही.
त्याआधी ताशा मशिनगनसारखा वाजला
आणि अंगावर मंत्राक्षतांचे छर्रे बरसले
तेव्हा कळले नाही.
पुन्हा पुन्हा भटजी कळवळून सांगत होते,
"सावधान! सावधान!!"
तेव्हा कळले नाही.
कळले नाही आणि आधी काही कळत नाही;
हेदेखील त्यावेळी कळले नाही.

०००

तिची आवडती भाजी : तांबडा भोपळा.
सुरुवातीला एकदा हळूच मला म्हणाली,
"जरा चिरून देता?"
तेव्हापासून रोज
मी भोपळा चिरून देतो तिला
ती स्वतःच दुध्या भोपळ्याची
तांबडा भोपळा होत गेली तरी
आणि तिचे गरम शब्द
अव्याहत आदळत राहतात माझ्या कानावर
तडतडणाऱ्या फोडणीबरोबर.
पुढे तिचे एकेक सांगणे नवीन नवीन
माझ्या वाढत्या वयातील जबाबदाऱ्या वाढवणारे.
केवढ्या हुकमतीने ती आता घालते
स्वयंपाकघरातून हाक
आणि बाहेर दचकून गळून पडतो
माझ्या हातातून पेपर.

पुढे कितीदा तरी वाटलं
एकदा तरी तिला दरडावून घालावी हाक
—— जे मला कधीच जमलं नाही.

०००

हेडक्लार्क झाल्यापासून
हपीसात वचकून असतात कारकून.
गुरखासुद्धा करतो सलाम
पोस्त वाढवून दिल्यापासून.
केस पांढरे व्हायला लागल्यापासून
सल्लासुद्धा विचारतात सहकारी.
भगवद्गीता दाखवतो वाचून
तेव्हा जातात लोकांच्या माना लवून
संयमावरचं निरूपण ऐकून.
भीती फक्त एकच वाटते,
ती म्हणणार नाही ना सर्वांदेखत——
"तोंड पहा संयम पाळा सांगणाऱ्याचं."

०००

आधीच घरी यायला उशीर झालेला
येता येता शेजारची शकू भेटलेली
त्यातून तिने सांगितलेला
पोळपाट आणायचा विसरलेला......
अचानक गरगरत आलेल्या लाटण्याने
डोक्याचा पोळपाट केलेला.

आपले देह असतात किती विसराळू
मनावर एकेक टेंगूळ वज्रलेप.

० ० ०

माझी अशी समजूत आहे,
आपण असतो मूलतत्त्वांची मुले.
प्रत्येकाची प्रमाणे वेगळी असतात एवढेच.
ती आहे निःसंशय अग्निकन्या

भडकून उठणारी
तडतडणारी
फुंकर मारली तरी ठिणग्या उधळणारी.

किती विझवू पाहिलं तरी
ते शक्य नाही या जन्मी;
माझ्यातल्या पाण्याची
केव्हाच वाफ झाली आहे.

° ° °

निदान पुढच्या जन्मी तरी सुटेन
असे म्हणून जन्म काढताना
माझ्या एकुलत्या एक दिलाशावर
होतो निर्वाणीचा निर्घृण हल्ला
जेव्हा ती करते कडकडीत उपास
आणि वडाला फेऱ्या घालून
मागते जन्मोजन्मी हाच पती.



## दहा

माझी अंत:प्रेरणा मालिका-कवितेच्या संस्कारातून कशीबशी बाहेर येते, तोच पुन्हा पाडगावकर उपजत चिकाटीने हजर झाले. दुसरी कुठली नाही तर, त्यांनी चक्क आपली बालकविता माझ्यावर संस्कार करण्यास काढली. त्यांच्या 'भोलानाथ'च्या संस्काराने मला स्फुरलेला भोलानाथही तितकाच अद्‌भुतरम्य आहे. मात्र माझी अंत:प्रेरणा आधीच वयात आलेली असल्याने तिला भलभलतेच प्रश्न पडले:

**सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल का ?**
**भिजलेली मीना माझ्या छत्रीत शिरेल का ?**

**भोलानाथ, रजेवर साहेब जाईल का ?**
**ऑफिसमध्ये 'ऑन ड्युटी' सुट्टी मिळेल का ?**
**भोलानाथ लिफ्टमध्ये लीना भेटेल का ?**
**हातात हात घेतला तर थप्पड मारेल का ?**

**भोलानाथ, माहेरी बायको जाईल का ?**
**डिफिकल्टी घेऊन घरी नीना येईल का ?**

**भोलानाथ, भोलानाथ, खरं सांगशील का ?**
**बायकोला हे कळलं तर धडगत राहील का ?**

## अकरा

अशा तऱ्हेने पुन्हापुन्हा तेच-तेच कवी माझ्या अंत:प्रेरणेवर संस्कार करीत आहेत आणि त्यासाठी मालिका-कवितेपासून बालकवितेपर्यंत काहीही वापरत आहेत हे पाहून माडगूळकर (थोरली पाती) पुढे झाले आणि आपल्या ज्येष्ठतेचा अधिकार वापरून त्यांनी माझ्या अंत:प्रेरणेची ह्या कवींपासून सुटका केली, आणि ते स्वत:च तिच्यावर संस्कार करू लागले. ग. दि. माडगूळकरांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेच्या संस्काराने माझी अंत:प्रेरणा चिंतनाभिमुख झाली. असे म्हणतात की गदिमां-

वर महर्षी वाल्मिकींच्या महाकाव्याचे लहानपणीच संस्कार झाल्याने त्यांनी गीत-रामायण लिहिले. माझ्या अंतःप्रेरणेनुसार, महर्षी वाल्मिकींवर जर गदिमांचे संस्कार झाले असते तर त्यांनी आश्रमात बागडणाऱ्या लवकुशांकडे पाहून कशी भावकविता लिहिली असती पहा. दुर्गाबाईंच्या मते, श्रेष्ठ साहित्य भूतकाळ–वर्तमान-काळ–भविष्यकाळ यांत ताण निर्माण करते. ग. दि. माडगूळकरांच्या 'नागडी नातवंडे 'ह्या कवितेने अनेक ताण निर्माण केलेच होते; पण त्याकवितेच्या संस्काराने स्फुरलेली प्रस्तुत कविता ही काळावर ताण करणारी आहे:

आकाशातून अधून मधून
पुष्पवृष्टी चालली आहे.
राजधानीत सुपारी ठेवून
अश्वमेध चालला आहे.
माझी सून सुन्न होऊन
आश्रमात तगत आहे.
माझी अजाण नातवंडे
अंगणात
नागड्याने बागडत आहेत.

कालचा वनवासी मानसपुत्र
आज सत्ताधीश झाला आहे.
उद्याचे सत्ताधीश
आज वनवासी झाले आहेत.
कालचीच वल्कले पुन्हा
राज्ञी आज ल्याली आहे.
धोब्या–न्यायाधीशांच्या डोळ्यांवर
पूर्वग्रहाची वडसे आली आहेत.
माझ्यासारख्या संन्याशामागे
(महा) माया लागली आहे.
माझी अजाण नातवंडे
अंगणात
नागड्याने बागडत आहेत.

यज्ञ सुरू झाला आहे.
अश्व आता निघणार आहे.
सर्व भूमी जिंकत जिंकत
आश्रमाकडे वळणार आहे
आजची अजाण नातवंडे
तेव्हा
यज्ञ अश्व रोखणार आहेत.
प्रचंड पराक्रम होऊन
राजापुढे ठाकणार आहेत.
मी लिहिलेल्या महाकाव्यास
परिशिष्ट जोडणार आहेत.
तोपर्यंत माझा हस्त
मस्तकावर रहाणार आहे.

माझी अजाण नातवंडे
अंगणात
नागड्याने बागडत आहेत.

## बारा

माझ्या अंत:प्ररणेचा इथवर प्रवास झाल्यावर, आरती प्रभूंचे संस्कार अटळ-पण सामोरे आले. त्यांच्या ‘ सर्सर सर्सर वाजे ’ ह्या नितांत निसर्गकवितेच्या संस्कारानंतर मी रेखाटलेले शहरी निसर्गाचे ‘ नादवाही चित्रसे ’ पहा :

### ट्रिंग् ट्रिंग् ट्रिंग् ट्रिंग् वाजे

ट्रिंग् ट्रिंग् ट्रिंग् ट्रिंग् वाजे
पत्ताच पत्ताच नाही ;
फोनशी निरोप आला
आत्ताच आत्ताच नाही.

सुळ्सुळ् सुळ्सुळ् गाड्या
पळत वळत जाती;
नुसत्याच हलून गाड्या
रस्ताच सरत नाही.

टण् टण् टण् टण् झाले
बस निघून गेली;
उलट उलट रांग
रस्त्यात वाढत गेली.

ठण् ठण् ठण् ठण् गेला
घाईत घाईत कोण ?
अॅम्ब्युलन्स की बंब ?
करीत रस्ता दुभंग.

पम् पम् पम् पम् वाजे
साचत साचत लांब
चौकात रहदारी
झालेला ट्रॅफिक जाम.

## तेरा

आणि आरती प्रभूंच्याच

‘ मी म्हणावे, सांजतारा तू नि मी तो पाहू ये,
तू म्हणावे, रानवारा दे ठरू ना वस्त्र हे ’

च्या प्रेमसंस्काराने स्फुरलेला हा नाट्यमय ‘ शो नवाचा :’

### शो नवाचा

मी म्हणावे, शो नवाचा तू नि मी तो पाहु ये,
तू म्हणावे, तिकिट ते कैसे मिळावे सांग रे ?

मी म्हणावे, डिंपुलीचा बॉबि तो येई जुना,
तू म्हणावे, पाहिला मी प्रिंट तुटकी अन् पुन्हा.

मी म्हणावे, शो मरू दे जाउ या बागेतच,
तू म्हणावे, वेळ झाली बंद झाले फाटक.

मी म्हणावे, गे किनारी बाक ही ना मोकळे,
तू म्हणावे, सर्व वाळू माणसांनी झाकळे.

मी म्हणावे, मार गोली बैसु आपण ये इथे,
तू म्हणावे, सांडलेली भेळ येथे अन् तिथे.

मी म्हणावे, शो उद्याचा तू नि मी तो पाहु ये,
तू म्हणावे, जायचे मजला उद्या दुसऱ्यासवे.



## चौदा

माझी अंत:प्रेरणा अशी निखळ गीतांमध्ये शिरल्यानंतर गझलांकडे वळणे क्रमप्राप्त होते. वेगळ्या रंगाचे कवो सुरेश भट ह्यांच्या शुद्ध संस्कारांनंतरही मं' केलेले गझलचे हे 'वांधे' पहा :

### वांधे

हो ठोकरून गेली, ती ठोकरून गेली
जी भेटली मला ती वांधा करून गेली

वर्गातली सुकन्या मागून नोट्स गेली
रेखीव अक्षरांचा घ्यावा मुका म्हणाली
स्वप्नामध्येच माझा रस्ता बुडून गेला
नापास मी, सुकन्या उत्तीर्णवून गेली

ऑफिसमधील बाला किति गोंधळून गेली
'करु काय फायलींचे' मज 'प्लीज' ती म्हणाली
ती लांबसडक बोटे मन मोहरून गेली
मेमो मला मिळे, ती बढती मिळून गेली

कशि काय एक मुग्धा सांगून मजसि आली
हुरळून मी पसंत तात्काळ तिजसि केली
बाशिंग बांधिले मी कुजबूज तो उडाली
भलताच कर धरूनी नवरी पळून गेली

ही ठोकरून गेली, ती ठोकरून गेली
जी भेटली गडे ती 'नाथा' करून गेली.

# पंधरा

आणि सुरेश भटांच्याच

‘अद्याप या सुऱ्याला माझा सराव नाही
अद्याप ही पुरेसा हा खोल घाव नाही

............

............

ओठी तुझ्या न आले अद्याप नाव माझे
अन् ओठ शोधण्याचा माझा स्वभाव नाही’

ह्या ‘एल्गारा’च्या संस्काराने स्फुरलेली गझल कशी अनोख्या हुरहुरीत आकंठबुडाली आहे पहा

**स्वभाव**

अद्याप या सुरेला माझा सराव नाही
अद्यापही पुरेसा लाथेस ताव नाही

तू दूर कोपऱ्यात बसशी मिटून ओठ
धृवचांदणी गडे या जणु गावचीच नाही

धरूनी मुठीत प्राण मी ढोसतो ढसासा
आता भल्याभल्यांच्या पेल्यांत द्राव नाही

कोणी पिती विसरण्या, कोणी फुशारण्यास
जे बुडविण्यास भीती त्यांचा निभाव नाही

जे बोलता न ये ज्यां शुद्धीत सभ्यतेच्या
ते त्यां सुनावण्यास आता रूकाव नाही

पार्टीत पळपुटयांच्या सामील वाघ-सिंह
आणि कुरंगनयनांविण पूर्णभाव नाही

रेंगाळण्यास दृष्टी लाजे जिथे जनात
धुंदीत हात सुद्धा फिरता शिकाव नाही

त्यांना कशां विचारू झाले खलास काजू ?
काजूविणा जयांना कसलीच हाव नाही

नवखा जरी इथे मी ही ' शूर काचपात्रे '
केली किती रिकामी, हाता विसाव नाही

का आज झोकली ती दारू मवाळ होती
डोक्यात अजुन माझ्या कसला बनाव नाही

सध्याच माणसांनी एलगार येथ केला
मी पिउनही रिकामा, हुरहूर जात नाही

ओठी तुझ्या चढावी मम प्रीतिची सुरा ही
किति वाटलेहि केला मी व्यक्त भाव नाही

ओठी तुझ्या न गेला अद्याप एक घोट
अन् नाक दाबण्याचा माझा स्वभाव नाही



म. ठा. ग्रंथ संग्रहालय ठाणे
2490
दा. क. 27330
काव्य २५५५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## सोळा

गझलांतून निघालेली माझी अंत:प्रेरणा सहाजिकच रुबायांच्या नाजुक बंधनात गुरफटली. सुमाष प्रभूंच्या 'मनाहून खोल' रुबायांच्या संस्काराने स्फुरलेल्या ह्या बंद दाराबाहेरील रुबाया कुणाचेही मन सुन्न करून टाकतील.

### बंद दाराबाहेरील रुबाया

मनाहून लोणी तुझ्या घट्ट आहे प्रिये, लाडके
घरी यावयाला जरी रात्र झाली उघड ना कडी
असा काय माझा गुन्हा सांग झाला ? अता आठवे,
कसा मी विसरलो असे आणण्याला फुलांची पुडी !

हिवाळी हवेने मला सर्द केले भरे हुडहुडी
कानी तुझ्या का न जाई तरी आर्त ही प्रार्थना ?
असे गोठला का तुझ्या अंतरीचा दयेचा झरा
कशी कुंभकर्णी अशी येइ निद्रा तुझ्या लोचना ?

किती वाजवू दार रस्त्यावरी श्वान झाले जमा
नक्कीच तू जागशी आत चाहूल ये ऐकण्या
मला उंदराचीहि वाटे असूया फटीतुन् शिरे
भिऊनी तयाला तरी दार तू ये अता उघडण्या

(स्वगत)

तिने ताडिले काय होतो कुठे मी अशा रात्रिचा ?
कपोलावरी का खुणा राहिल्या ते तिने पाहिले ?
असे भास—की मागचे दार लोटून कोणी पळे ?
अता बंद दारांतरीची कहाणी मला आकळे !

## सतरा

इथवर तसा सरळ प्रवास केल्यावर, माझ्या अंत:प्रेरणेचा प्रतिमांच्या निबिड जंगलात प्रवेश अपरिहार्यच होता. खुद्द ग्रेस यांच्या संलग्न प्रतिमांच्या किरँ पोताचा संस्कार अंगावर घ्यावा लागला. त्यांच्या

मी पुरुष असतांनाही
तू केस उदविले माझे
गंगेच्या पाण्यावरती
तू दिले केवढे ओझे

ह्या जिवाच्या वैष्णवीच्या संस्कारानंतर माझ्या अंत:प्रेरणेची ती स्त्री असतानाही झालेली दशा पहा :

### ब्यूटी पार्लरपाली

मी पुरुष असतांनाही
शांपुलेस माझे केस
ओंजळीत बेसिन धरते
तो अवघडलेला फेस

नाचती शिकाऊ भंवती
बायांतिल दोघ्या वेडचा
सांडुनी मोर जरतारी
लपविती गळचातिल बेडचा

नि:शेष मला करताना
बाटल्या तुझ्या हाताशी
त्या फासत होत्या सगळचा
लोशने मला कसलीशी

नागिणिचे उघडुन तोंड
पांढरे डोह भरलेले
त्या वळलेल्या नाग्यांनी
उचलून वस्त्र धरलेले

मी पुरुष असतांनाही
घालिसि मज कंठस्नान
कोंडली वाफ कोसळते
रक्ताचे ठेउन भान

भिंतीवर लटके चित्र
चित्रात चर्चच्या घंटा
ज्या नादाविण किणकिणल्या
फिरता माने वर'वंटा

मज खुडून घेती आत
आरसे चहुकडे मोठे
जो गालावरून उडाला
तो तीळ लपविला कोठे ?

मी पुरुष असतांनाही
सजविल्या नखांच्या ओळी
रात्रिच्या उकलिता गाठी
ती हसू लपविते चोळी

मी पुरुष असतांनाही
कोरल्या भुवईच्या रेषा
चिमटीत तुझ्या चिमटयाच्या
केसांच्या भिजल्या भाषा

हलकेच बांधुनी बाई
भोवती गळयाच्या वस्त्र
षोडषोपचार कराया
तू हाती घेई शस्त्र

तू ब्यूटीपार्लरवाली
माझ्यावर करसि प्रयोग
हे सरावण्या तव हात
या कायेला उपयोग

कायेवर फिरुनी माझ्या
आयुधे प्राषिती धार
हे असे पुरुष ही थोडे
फॅशनचे उघडिति दार

मी अमूर्त तो पाषाण
लेण्यात उतरला खाली
छिनलेल्या मम केसांची
वेगाने कमळे झाली !



## अठरा

माझी अंत:प्रेरणा एकदा प्रतिमांच्या आवर्तात गरगरू लागल्यावर, जो तो कवी आपापल्या प्रतिमा घेऊन संस्कार करण्यास धावून आला. तिला थोडा दिलासा 'त्या' 'शंकर' वैद्यांनी देऊन दुर्बोध प्रतिमांकडून थोडया कमी दुर्बोध प्रतिमांकडे आणले. त्यांच्या

शिलाहार नृपति– प्रथम अपरादित्य→

ह्या कवितेच्या प्रयोगामुळे माझ्या अंत:प्रेरणेने चिन्हांकित केलेला हा सद्य अपरादित्य

शिलाहार नृपति – सद्य अपरादित्य –→ S
सरसावून घेतलेल्या आरोहासारख्याSSSS
उंच चढत गेलेल्या गगनचुंबी इमारती
१ पक्षी त्यावरील दूरचित्रप्रापक स्तंभाशी
लगट करीत आहे————————⊐
⊏——→

प्रियकरास चुंबन देताना
एकान्त लाभला म्हणून अंधाऱ्या विद्युदारोहात : ↑ :
जीवनाची जलदगामिनी झालेली नागर कामिनी
दचकली :
तेव्हाच तिच्या बटव्यावरून उडाला––
आवाज न करता
तो निळापांढरा पक्षी ——→
आणि झपकन् उतरला तळमजल्यावरील सर्व वस्तुभांडारात.

: ↑ :

आणि दिक्काल रोधून आता
शयनगृहात प्रियकराच्या अंगावर उतरली आहेत
कवचकुंडले
प्रणयाराधन करताना आठवणीने
शिलाहार नृपति – सद्य अपरादित्य ¡

## एकोणीस

शंकर वैद्य मला एकाच कवितेवर सोडणारे नव्हते. त्यांच्या ' उत्तररंगाने ' माझ्या अंतःप्रेरणेस हिंस्त्र प्रतिमासृष्टीतून, कोमल भावसृष्टीत आणले. उत्तररंगातील छोटया छोटया, सुटया सुटया तुकडयांच्या संस्कारानंतर माझ्या अंतःप्रेरणेने ' उत्तरोत्तर रंग ' उधळले. उत्तररंगात झेंडूची फुले ओवता ओवता केशरी होत जाणाऱ्या दोऱ्याचा उत्तरोत्तर रंगात मात्र, गुंडी शिवता शिवता पार गुंता होतो. त्या गुंत्यांचे हे :–

### उत्तरोत्तर रंग

माझे काडयाकाटक्यांचे घर अद्याप बांधावयाचे आहे
माझे पंख आळसावून बसले आहेत
हे आभाळ तर अनंत आहे
यात तुझी नि माझी भेट कुठे आणि कशी होणार !
म्हणून माझे आळसावलेले पंख
तसेच बसून उडणाऱ्यांना वेडावून दाखवत आहेत ! !

० ० ०

तू दोऱ्याने गुंडी शिवत होतीस
पण शिवता शिवता दोऱ्याचा पार गुंता झाला
... तुझ्या माझ्या संबंधात मला एवढेच सांगायचे आहे !

० ० ०

निऑन साइन्स चमचमत होत्या. लाल, निळ्या, हिरव्या
रंगाच्या छटांनी डोळे दिपत होते.
त्या गर्दीतून चालताना तू बरोबर होतीस. भर संध्याकाळी
सकाळसारखी धावपळ. निऑन साइन्स आवाज न करता
तडफडत होत्या.

आजही निऑन साइन्स चमचमताहेत. पण त्यातून मी
एकटाच चाललो आहे.
आता मला ही नगरी, डोळे मारणाऱ्या पोरीसारखी दिसते
आहे !

० ० ०

ती हिरवी साडीवाली बाई पहाताना मला तुझी का बरे
आठवण येत आहे ?
तुझी अशीच एखादी साडी होती किंवा आहे काय ?
पण आठवणीचं हे कारण नसावं...कारण
मला तुझा भास झाला तो तिच्या दोन
भुवयांकडे पहाताना--
मी पाहिलं की तिच्या दोन
भुवयांच्या मधोमध एक आठी उमटत आहे !

० ० ०

तो समोर दिसणारा जळता दिवा
एकदम विझून गेला
आणि कधी जळत होता हे ही विसरला.
ते पहाताना मला येत होती आठवण
अनिवार क्षणी
मध्येच एकदम झोपेत बुडणाऱ्या तुझी.

० ० ०

आपल्या दोघांचे काहीतरी बिनसले होते
तशात तू फणसाचे गरे आणून माझ्यापुढे ठेवलेस.
मी रागाच्या भरात ते भिरकावले खिडकीच्या बाहेर
तू रागावून निघून गेलीस.

आता संध्याकाळ झाली आहे. आणि खिडकी बाहेर
फणसाच्या झाडाला फणस लटकले आहेत !

० ० ०

गाडीत आपण समोरासमोर बसलो होतो
मी बरोबर आणली होती एक रहस्यकथा
किती उत्सुकतेने मागतलीस तू ती
हातात घेतलीस,
छातीशी धरलीस,
मांडीवर ठेवलीस
आणि अधीऱ्या डोळ्यांनी नुसती
वाचत गेलीस.
माझी उतरायची वेळ झाली
तेव्हा हिरमोड होऊन परत दिलीस
ती अर्धवट वाचलेली रहस्यकथा.
मला आठवतो तुझा हिरमुसला चेहरा
आणि तू न वाचलेला त्या रहस्यकथेचा
मला माहीत असलेला शेवट !



माझी अंत:प्रेरणा अशी भावेजू लागल्यावर अनेक भावकवी उत्कट आणि तरलपणे पुढे सरसावू लागले. त्यामध्ये सहाजिकच कवयित्रींचा भरणा अधिक होता. शिवाय इतका वेळ एकाही कवयित्रीला वाव न दिला गेल्यामुळे त्या थोड्या रूष्टही होत्या. तेव्हा त्यांना Poetic Justice देणे भाग होते. सुनीता पुजार ह्या उगवत्या कवयित्रीच्या अशाच सुट्या तुकड्यांच्या

' ...कुठून मिळाली तुला ही सोनचाफ्याची फुले ... '

या कवितेच्या संस्कारानंतर माझ्या अंत:प्रेरणेच्या हाती पडलेली ही कोमल हळवी ' अमर अकबर... ची तिकिटं '

## ही अमर अकबर...ची तिकिटं

" माझे तुझ्याकडून...तुझे मला... "
असे बोलू नकोस ना काहीबाही
माझ्या पर्समध्ये दोनच रुपये राहिल्येत
नको ना त्याला गळती लावूस
जुनी येणी देणी उकरून.

० ० ०

जीव तोडून धावताना
तू फार विनोदी दिसतोस
पण नुसत्याच फुगत जाणाऱ्या
तुझ्या पोटाला तेच बरे.
जरा वजन तरी उतरेल !

० ० ०

हल्ली हल्ली भेटणे ही थांबलेले
तुझ्या माझ्या अपघातानेच डोळेभेटी.
तुझ्या बरोबर
कधी अंजू...कधी मंजू...कधी...

कशाला हवेत उगाच खुलासे
तोंडावरती नव्हेस हसे ?

० ० ०

तुला कशी मिळली ही ' अमर अकबर...'ची तिकिटं ?
मी किती थेटरे फिरले
सगळीकडे ' हाऊस फुल्ल 'च्या पाटयांशिवाय काहीच तर
नव्हतं !

० ० ०

आपण निरोप घेतला
तेव्हा तुझा हात हातात घेऊन
मी तुझं घड्याळ पाहिलं होतं.
असलं कसलं तुझं घड्याळ
सात पन्नासची फास्ट मिळालीच नाही मला !

० ० ०

नुसताच चहा घेऊन
त्या कोपऱ्यात बसून
मी तुझीच वाट पहात होते
पण हे त्या वेटरला कसं कळलं ?
त्यानं बिल आणायची घाई केली नाही.

० ० ०

मला तुझ्याबरोबर पिक्चरला यायचा मोह होत नसेल
असं वाटतं का तुला ?
यावसं वाटलं तरी आता शक्य नाही रे
माझ्या सी एल्स केव्हांच संपल्या आहेत !

० ० ०

किती नको म्हणून सांगितलं होतं तरी
तू मला ऑफिसात फोन केलासंच.
तुला हे ही सांगायला हवं होतं का
आमचा बॉस फार खडूस आहे ?

० ० ०

तुझ्याकडून निघतानाच तुटली होती चप्पल
आणि हे ही ठाउक नव्हतं तिकडे चांभार नाहीत !

० ० ०

टीकाकार होऊन आलायस्
पण उध्वस्त करून घ्यायला
मी आणखी कविताच लिहिणार नाय्यैय !

० ० ०

## एकवीस

'मी आणखी कविताच लिहिणार नाय्यैय' असे माझी अंतःप्रेरणा म्हणत असली तरी त्यानंतर नवनवीन कवयित्रींची मोठीच ताईगर्दी तिच्यावर संस्कार करीत राहिली. आणि एकदा कवयित्रींच्या प्रतिमासृष्टीत शिरल्यावर, तिला 'मृदुपवनगवाक्षी बैसता' यावी तशी झोप आली. ज्योती पागनीसांच्या कवितांच्या संस्कारांनी तर ती चक्क घोरू लागली. हा सगळा त्यांनी घेतलेल्या कुशल प्रतिमांचा परिणाम. त्यांच्या

ह्या काळोखात
पुन्हा नाही ऐकवणार मी तुला
माझी लयमग्न कहाणी
मला माझ्या दुःखांचे संदर्भ सापडत नाहीत
......
मिथुनानंतर कुठे हरवतात उजेडात आपले चेहरे ?
......

या कवितेच्या काळोखात माझ्या अंत:प्रेरणेने संदर्भलेले अंगाई गीत :

## ह्या काळोखात

ह्या काळोखात
पुन्हा नाही सांगणार मी तुला
उघडं ठेवायला बेडरूमचं दार
घरात कुणी तिसरं नसलं तरी,
माझे संदर्भ माझा डोळा चुकवून निसटून जातात.
मग माझ्या कवितेत मी कोपऱ्याकोपऱ्यावर कुणाला रोवूं ?
मिथुनानंतर सापडतातच आपल्याला आपापले कपडे
अभवितपणे :
मला खूप आठवणी येताहेत.
कपाळावर आठ्या रचून बघण्याचे दिवस तुला आठवतात का?
मला आठवतोय,
माझ्या मिठीत घोरणारा 'माझा' नवरा
– त्याच्या मिशा कुणी कापल्या ?
तुला त्याच्या मिशांची आठवण येते आहे का ?
तू न घोरता, झोपून गेलास वाटतं नेहमीसारखा ?
नाही विचारत मी तुला
झोप तू.



## बावीस

अशा प्रतिमांच्या जाळ्यात गुरफटलेल्या माझ्या अंतःप्रेरणेने नंतर यशोधरा साठ्यांच्या 'लिलाव' कवितेच्या संस्कारामुळे, सर्व प्रतिमांचीच प्रतिमा करून टाकून उघडलेले हे छत्रीचे कमळ :

### छत्रीचे कमळ

हातात छत्रीचे कमळ मिरवीत आम्ही चालणार आहोत
पावसाचा अर्थ विचारीत आल्यागेल्याला.
तुमची छत्री चोरीला गेली ? – हरकत नाही !
आमची छत्री तरी आमची कुठे आहे ?



कमळांची प्रतिमा आत्तापर्यंत पुष्कळ कवींनी वापरली आहे. परंतु प्रस्तुत कवितेतील छत्रीचे कमळ हे कवितांत वापरल्या जाणाऱ्या प्रतिमांचेच प्रतीक आहे. कवी प्रतिमा एखाद्या छत्रीसारखी वापरतात. प्रत्यक्ष अनुभवाचा अर्थ इतरांवर सोपवतात, आणि ह्या प्रतिमा देखील चोरीस गेल्या तरी हरकत नाही. आता कोणीही, कोणाचीही, कोणतीही प्रतिमा केव्हांही, कशीही वापरावी; प्रतिमांवर आता सर्वांची समाईक मालकी आहे; अशी क्रांतिकारक ग्वाही ही कविता देते.

## तेवीस

कवयित्रींची वाढती गर्दी पाहून, तरूण कवी नितीन दादरावाला लगबगीने त्यात आपली कविता घेऊन शिरले. त्यांच्या 'पिरॅमिड' कवितेच्या संस्कारामुळे माझ्या अंत:प्रेरणेने उभारलेला 'ताजमहाल,' कवितेत नवनवीन विषय आणीत असला तरी मूलत: जुन्या कवितांप्रमाणें कथात्म आहे.

### ताजमहाल

मेन गेट मधून सरळ गेलं की मेन बिल्डिंग लागते
पहिल्या मजल्यावर चढल्यावर
डावीकडे वळून दोन वर्ग सोडले
की लागतो एस् वाय् चा वर्ग.
वर्गातल्या डावीकडच्या रांगेतलं तिसरं बाक
तिथे बसतो आम्ही
ती आणि मी !
छे: ! आम्हीच !
......
......
भ्यालीस ? परीक्षा आली म्हणून ?
यंदा नापास झालीस तर तुझे वडील तुझं लग्न लावून देतील ?
माझे वडीलही पाठवणार नाहीत मला कॉलेजात नापास
झालो तर.
पेपर चांगले लिहू या म्हणतेस ?
कसं शक्य आहे ते परीक्षेत ?
पण मी मिळतात का पाहीन फुटलेले पेपर
तू आणशील ना लपवून – मॅक्सीतून – उत्तरांचे कागद ?
येथेही शक्यता आहें हल्ला होण्याची
सुपरवायझरचे लक्ष वेधले जाण्याची.
धीराने वाग.

सिनेमे, कॅन्टीन सोडशील ना आता ?
Likely Questions वाचशील ना आता ?
बेस्ट ऑफ लक.
तुला नि मला !
छे: ! आपल्यालाच !
परीक्षापिपासू शक्तींनो, तुम्ही येणार ?
या !

......

......

आजही मेनगेट मधून सरळ गेलात की मेन बिल्डिंग लागल
पहिल्या मजल्यावर चढल्यावर
डावीकडे वळून दोन वर्ग सोडले
की लागेल एस् वाय् चा वर्ग.
डावीकडल्या रांगेत तिसऱ्या बाकावर
आजही असतील ... दुसरेच कोणी
तो आणि ती
छे: ! आम्हीच !
कारण आम्ही बांधलेला नाही ताजमहाल !
आम्ही बांधलेला नाही ताजमहाल ! !

## चोवीस

माझी अंत:प्रेरणा असे नवे विषय कवितेत आणीत असताना, ॲग्नेस यांच्या ' किरमिजी घन'च्या संस्कारामुळे, ती अभिव्यक्तीच्या बाबतीत आपल्या प्राचीन परंपरेकडे वळली. ह्या नव्या घननीळ ध्यासाची फासळी अद्याप अभंगात गुंतली आहे.

### घननीळ ध्यास

घरादारा लागे घननीळ ध्यास
सोनेरी आरास मालवली

थंडावली आता हिरवी शेगडी
कढई बापडी दूर उभी

ओठांत घुमेना कुकरच्या शीळ
गॅस घननीळ भेटवा गा

परतली घरा माणसे दमून
बशा ऊन ऊन केवीं आता

ना चना भटोरा इडली, पॅटीस
भाजले कणीस ते ही नाही

अचानक आले पाहुण्यांचे थवे
तरी थंड तवे रसोईत

फर्फरीचे स्टोव्ह त्याही ना रॉकेल
गाठावे हॉटेल किती दीस ?

सुगरण मनी जाहली उदास
द्रौपदीची लाज ‘ घननीळा ’



## पंचवीस

माझी अंत:प्रेरणा अशी अस्सल मऱ्हाटी परंपरेशी नाते जोडीत असतानाच, तिचा परिचय जपानीतून मराठीत आयात केलेल्या हायकूंशी झाला. त्यामुळे ती स्वतःच हायकू रचू लागली. तिने रेखाटलेल्या ह्या 'स्कूटरवरील आठ हायकू'त इतर मराठी हायकूत आढळतात (तितपत) हायकूची बाह्य व्यवच्छेदक लक्षणे तर आहेतच पण सूचित गूढवाद आणि डबके देखील आहे.

### स्कूटरवरील आठ हायकू

१

सात मारता लाथा केले
घुरुघुरु परि ना सुरू
लाथ 'आठवी' येता का मग इंजिन झाले सुरू ?

२

आजूस बाजूस सुळसुळ् स्कूटर्स
कमरेभोवती घट्ट विळखे
माझ्या पोटावर कातडी पट्टा

३

टिचभर आरशाच्या झरोक्यातून
कितीक वाहनांचे डोळे
सगळे माझ्यावर खिळलेले

४

अनोळखी परिसर, वळणारे रस्ते
घसरणाऱ्या टायरला
सावरणारे डबके

५

डबके म्हणाले साई सुट्टचो ऽ
पावसाने डोळे उघडले
सापडले ! सापडले ! पाटीवरचे नंबर लपलेले !

६

डोक्यावरून सरकत गेले जर्द गुलमोहराचे तुरे
आडबाजूस गर्द झाडीशी
एकटीच एक स्कूटर उभी

७

हिरवी बत्ती लाल जाहली
तरि गेलो पट्दिशी
कुणीही नव्हते तरीहि आली शिट्टी कर्कश कशी ?

८

हँडलवर टेकलेल्या वहीवरून चालणारी
हेलकावे खाणारी पेन्सिल थांबली
एक लाल नोट हळूच पांढऱ्या कोटात शिरली



## सव्वीस

माझ्या अंत:प्रेरणेची अशी परकीय काव्यप्रकारांशी सलगी करण्यापर्यंत मजल गेली, आणि तरीही तिने आपल्या मातीतल्या दलित कवितेकडे न्याय्य लक्ष दिले नाही म्हणून दलित कवींनी हमला बोल’ला त्यातल्या दया पवारांच्या

‘ दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिलेलं ’

च्या संस्काराने माझ्या अंत:प्रेरणेस जाणवलेली ही सह अनुभूती

दु:खाने गदगदणारी ही झाडे मी पाहिलेली
तशी यांची मुळे खोलवर बोधिवृक्षासारखी
हजारो वर्षं पायाखाली दडपल्या मातीतून निघालेली
पण आता यांचा सगळा विस्तार आकाशात झालेला
शुभ्र ढगांच्या मैफलीत शेंड्यांच्या माना डुललेल्या

भुई फोडून सामोरं येणारं एखादं फुटकं तुटकं मूळ
महारोग्याच्या बोटासारखं ध्यानी मनी नसताना
ओळख तरी कशी दाखवावी बरोबर इतर थोर ढग असताना ?

बोधिवृक्षाला गौतम तरी भेटलेला
आणि त्याच्या पारंब्या जमिनीकडे निघालेल्या
हे माझे शेंडे एकटे काय करणार आप्पाजी ?
रुंदावणाऱ्या आकाशाच्या कक्षांबरोबर
मातीपासूनचे सनातन अंतर दुणावताना
अगतिकतेनं गदगदणारी ही झाडं मी पाहिलेली

## सत्तावीस

माझी अंत:प्रेरणा अशी गंभीर होऊन राहिलेली असताना, ‘आमची माती–आमचा निसर्ग ’ ह्या दोन्हीवर दावा सांगणाऱ्या ना. धों. महानोरांनी तिचा ताबा घेतला. त्यांच्या खास शेतावरल्या, वाऱ्यावर आलेल्या, पोपटी पंखांच्या ‘ पावसाळी दिवसांच्या ’ रसरशीत संस्कारानंतर, माझ्या अंत:प्रेरणेने मात्र स्वानुभूत शहरी

पावसाळी दिवस कागदांवर उतरविले. ते ' हे पावसाळी दिवस '

**हे पावसाळी दिवस**

हे पावसाळी दिवस झाऱ्यावर येतात तांबुसचर्र रंगाच्या
कांदेनवमी भज्यांच्या दाटीवाटीने निथळतात.
पाणावलेल्या जिभेवरचे तारू होऊन लहरत जातात.
अमावस्येच्या धुंद ओल्या काळोखात बुडवतात
हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस धूळ झाडतात रानावनातली,
घरातल्या सांदी कोपऱ्यातल्या छत्र्या रेनकोटांवरची.
ओलेत्या छत्र्यांच्या घोळक्यातून चोराच्या पावलांनी
अभिसारिका होऊन निसटून जातात हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस छत्र्यांवर घेत माणसे खोळंबतात
विस्कळित झालेल्या लोकल-बससाठी.
हे पावसाळी दिवस ठिबकतात गळणाऱ्या छतांतून
चपलांना चिखलांसारखे चिकटून येतात.
पाणी साचलेल्या रस्त्यांत बायका
एक एक पाय टाकीत जातात
पातळे उचलून धरीत कावऱ्याबावऱ्या थर्थरून थोड्या
गोऱ्या पोटऱ्यांवर उठवतात सर्सरून काटा
हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस टपोरतात, रस्त्यावर जिकडे तिकडे
नवऱ्यांबरोबर फिरायला जाणाऱ्या नवोढा पोरींच्या
उमलत्या पोटांवर.
हे पावसाळी दिवस उगवतात कुत्र्यांच्या छत्र्यांबरोबर.
शब्दांच्या हुलकावणीत, हजारो कवींच्या
लाखों कविता होऊन
कागदावर किंवा पापडांवर उतरतात
हे पावसाळी दिवस !

## सव्वीस

माझ्या अंत:प्रेरणेची अशी परकीय काव्यप्रकारांशी सलगी करण्यापर्यंत मजल गेली, आणि तरीही तिने आपल्या मातीतल्या दलित कवितेकडे न्याय्य लक्ष दिले नाही म्हणून दलित कवींनी हमला बोल'ला त्यातल्या दया पवारांच्या

'दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिलेलं'

च्या संस्काराने माझ्या अंत:प्रेरणेस जाणवलेली ही सह अनुभूती

दु:खाने गदगदणारी ही झाडे मी पाहिलेली
तशी यांची मुळे खोलवर बोधिवृक्षासारखी
हजारो वर्षं पायाखाली दडपल्या मातीतून निघालेली
पण आता यांचा सगळा विस्तार आकाशात झालेला
शुभ्र ढगांच्या मैफलीत शेंड्यांच्या माना डुललेल्या

भुई फोडून सामोरं येणारं एखादं फुटकं तुटकं मूळ
महारोग्याच्या बोटासारखं ध्यानी मनी नसताना
ओळख तरी कशी दाखवावी बरोबर इतर थोर ढग असताना ?

बोधिवृक्षाला गौतम तरी भेटलेला
आणि त्याच्या पारंब्या जमिनीकडे निघालेल्या
हे माझे शेंडे एकटे काय करणार आप्पाजी ?
रुंदावणाऱ्या आकाशाच्या कक्षांबरोबर
मातीपासूनचे सनातन अंतर दुणावताना
अगतिकतेनं गदगदणारी ही झाडं मी पाहिलेली

## सत्तावीस

माझी अंत:प्रेरणा अशी गंभीर होऊन राहिलेली असताना, 'आमची माती–आमचा निसर्ग' ह्या दोन्हींवर दावा सांगणाऱ्या ना. धों. महानोरांनी तिचा ताबा घेतला. त्यांच्या खास शेतावरल्या, वाऱ्यावर आलेल्या, पोपटी पंखांच्या 'पावसाळी दिवसांच्या' रसरशीत संस्कारानंतर, माझ्या अंत:प्रेरणेने मात्र स्वानुभूत शहरी

पावसाळी दिवस कागदांवर उतरविले. ते ' हे पावसाळी दिवस '

## हे पावसाळी दिवस

हे पावसाळी दिवस झाऱ्यावर येतात तांबुसचरं रंगाच्या
कांदेनवमी भज्यांच्या दाटीवाटीने निथळतात.
पाणावलेल्या जिभेवरचे तारू होऊन लहरत जातात.
अमावस्येच्या धुंद ओल्या काळोखात बुडवतात
हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस धूळ झाडतात रानावनातली,
घरातल्या सांदी कोपऱ्यातल्या छत्र्या रेनकोटांवरची.
ओलेत्या छत्र्यांच्या घोळक्यातून चोराच्या पावलांनी
अभिसारिका होऊन निसटून जातात हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस छत्र्यांवर घेत माणसे खोळंबतात
विस्कळित झालेल्या लोकल-बससाठी.
हे पावसाळी दिवस ठिबकतात गळणाऱ्या छतांतून
चपलांना चिखलांसारखे चिकटून येतात.
पाणी साचलेल्या रस्त्यांत बायका
एक एक पाय टाकीत जातात
पातळे उचलून धरीत कावऱ्याबावऱ्या थर्थरून थोड्या
गोऱ्या पोटऱ्यांवर उठवतात सर्सरून काटा
हे पावसाळी दिवस.

हे पावसाळी दिवस टपोरतात, रस्त्यावर जिकडे तिकडे
नवऱ्यांबरोबर फिरायला जाणाऱ्या नवोढा पोरींच्या
उमलत्या पोटांवर.
हे पावसाळी दिवस उगवतात कुत्र्यांच्या छत्र्यांबरोबर.
शब्दांच्या हुलकावणीत, हजारो कवींच्या
लाखों कविता होऊन
कागदावर किंवा पापडांवर उतरतात
हे पावसाळी दिवस !

# अठ्ठावीस

ना. धों. महानोरांच बोट धरून माझी अंत:प्रेरणा चक्क चित्रपटगीतांकडे आकृष्ट होऊन लागली होती. पण तेवढ्यात ज्येष्ठ कवी अनिलांचे दक्ष संस्कार तिला लाभले. त्यांच्या ‘ झाले ’ कवितेच्या संस्कारानंतर माझ्या अंत:प्रेरणेने ‘ झाले गेले ’ या कवितेत आपल्या परीने अभिव्यक्तीतील भावनात्मक युक्तिवाद, जाणिवांचे आनुपूर्व्य आणि अर्थसघनता या सर्वांची पराकाष्ठा केलेली आहे.

## झाले गेले

दहाच ओळींच्या कविता लिहिल्या तर कुठे काय थोडे झाले
दहा म्हणजे दहाच असतात हेच काय थोडे झाले
खूप ओळी असत्या तर असते काय खूप झाले
म्हटले असते कुणी तरी उद्‌गारचिन्ह टाका झाले
आकाश आणि धरित्री सकट दिशा दहा हे एक झाले
म्हणून दशपदी प्रवासात लिहावी हे ही ठरल्यासारखेच झाले
दहा ओळींशी समवाय साधून रस आठांचे दहा झाले
अकरावा रस आळस हे अध्याहृत झाले
देहलीदीप न्यायाने हे देहेल्ल्यावर देहेल्ल्या झाले
जे काय सांगायचे ते दहा ओळीत संपून गेले !



# एकोणतीस

वास्तविक एकदा दशपदी लिहिल्यावर मी त्यापुढील सर्व कविता दहा ओळीं-च्याच लिहायला हव्या होत्या. परंतु तेवढ्यात कवितेत नित्य नवे प्रयोग आणणाऱ्या र. कृ. जोशांच्या मूर्त कविता अंगावर आल्यामुळे माझी अंत:प्रेरणा ओळींचेच काय — पण कसलेच बंधन पाळीनाशी झाली. र. कृ. जोशांच्या राजकीय कवितांच्या संस्कारानंतर स्फुरलेली ही १९७७ सालावरची कविता :

१९७७

७७
७७
७७
७७
७७
७७
७७
७७
७७
७७
७७
७७

ग्रंथ संग्रहालय ठाणे
2470
दा. क्र. 27330
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

ह्या कवितेत सूचकता आणि द्रष्टेपणा तर आहेच. परंतु या कवितेत प्रथमच जाणिवेचे एकमेकांत गुंतलेले, एकमेकांवर सावल्या पाडणारे दोन स्तर दृष्यस्वरूपात दोन वेगळी वेगळी मुद्राक्षरे वापरून व्यक्त झालेले आहेत. डॉ. आनंद यादव यांच्या मते सेंद्रीय संघटनेचा लवचिक आकार व्यक्त करू पहाणाऱ्या लेखनावर अनुक्रमाची जाचक मर्यादा पडते. म्हणजे, एखाद्या कवितेतील ओळी जशा येतील तशा एका-मागून एक वाचाव्या लागल्यामुळे वाचकास एकाच कल्पबंधाची प्रचीती येते. पण हे बंधन ही प्रस्तुत कवितेने ओलांडले आहे. कारण तिच्यातील सर्व ओळी सारख्याच आहेत !

## तीस

माझ्या अंत:प्रेरणेच्या जाणिवा इतक्या प्रगल्भ होत जाईपर्यंत ती पार थकून गेली होती. तरी ह्या महाराष्ट्र देशीच्या, संस्कार करू पहाणाऱ्या कवींचा गराडा काही कमी होत नव्हता. कशीबशी ती ह्या गराड्यातून वाट काढीत बाहेर आली· बाहेर या गर्दीपासून फटकून चार पाच जणांचा घोळका अलिप्तपणे उभा होता. इतर कवींच्या संस्कारांपासून सुटका व्हावी म्हणून तिने या घोळक्याचा आश्रय घतला. त्यातला एका इसमाने तिला 'वेडाच्या टेबलावर बैस पावासारखी' असा सल्ला दिला. बिचारी अंत:प्रेरणा भांबावून बसल्यावर त्याने चक्क 'चर्र विझलेला कावळा' पुढे ठेवला. त्या अरूण कोलटकरांच्या बिधास कावळ्याच्या, नभनिवडुंगाप्रमाण शून्यावर उगारलेल्या स्तंभित डोळ्याच्या संस्करणाने माझ्या अत:प्रेरणेची झालेली हताश चिमणी :

### चर्र विझलेली चिमणी

चर्र विझलेली चिमणी
तिच्या नशिबाच्या अभंग काचेआड.
तिच्या चोचीच्या बुजलेल्या चुलीतून
हताश उगवलेले खुरटे तण......

गलबलतो चिमणीचा आत्मा
तिच्या ओघळलेल्या खांद्यांतून
चोचीत चोच घालून खुळ्या
भरवल्या नाहीत कोणीच अळ्या...

चिमणीचे घरटे
जिथे उलटे होते
तिथे खरबदार कलाटणी घेतात
तिच्या हस्तरेषा --
तिच्या नशिबीच्या अनंग राखेआड.

## एकतीस

आपले संस्कार करून होताच, अरुण कोलटकरांनी आपल्या घोळक्याच्या परंपरेप्रमाणे, माझ्या अंत:प्रेरणेला शेजारी उभ्या असलेल्या दिलीप पु. चित्र्यांच्या स्वाधीन केले. त्यांच्या

' प्रेषिताच्या डोळ्यात असतो प्रकाशाचा स्क्रू '

या कवितेच्या संस्कारानंतर माझ्या अंत:प्रेरणेने शब्दबद्ध केलेले हे समस्त बिढारी टोळक्याचेच चित्र. दिलीप पु. यांच्या संस्कारामुळे ह्या कवितेस गद्याचा किती समृद्ध वारसा लाभला आहे पहा :

### बिढाऱ्यांच्या डोक्यात असतात

बिढाऱ्यांच्या डोक्यात असतात जन्मजात अग्रेसर स्क्रू
ड्रायव्हर.
फिट्ट पिळून टाकता येतात त्यांना कुठेही कुठलेही शब्द
उदाहरणार्थ: उदाहरणार्थ.
त्यांच्या वाणीत असतो कंटाळा आणि आणि आवाजात
कमावलेला अलिप्तपणा. बिढारी जेव्हां लिहितात एकंदरीत
तेव्हां टीकाकार भुंकत नाहीत. फक्त त्यांच्या तोंडाचा आ वास-
लेला रहातो. मधल्या मधल्या साहित्यसंमेलनांच्या अध्यक्षांना
करावा लागतो बिढाऱ्यांचा उल्लेख
अबिढऱ्यांची बळावत जाणारी जंत्री पांगवताना
शेवटी
जशी जमत आलेली सिगरेटची राख झटकताना
चुटकी.
बिढारी जेव्हां येतात दूरदर्शनाच्या पडद्यावर पाय पसरून
बसतात; तेव्हा परकीय केंद्राचीही होत नाही छाती
पदक्षेप करण्याची. एक बिढारी बोलायला लागल्यावर हटकून
घेतो नाव दुसऱ्या बिढाऱ्याचे, जसे अव्वल इंग्रजीचे
ज्ञानेश्वरांनंतर. बिढारी लिहितात कविता कवितेनंतरच्या.
कादंबऱ्या कादंबऱ्यान् आधीच्या-आणि आपल्या स्फुट लेखाच्या
मोजून चार ओळी शेवटच्या टाकतात कापून. व्हिस्कर्ससारख्या.

बिढाऱ्यांना मिळतात आंतरराष्ट्रीय पारितोषिके आणि
मोठाल्या मिशा
वाढवल्या तरी त्यांची चेष्टा करतात दाढीवाले
संपादकांच्या कचेरीत बसून;
पण बिढारी कधीच जात नाहीत हबकून.
त्यांना जन्मतःच असते अमर्याद खात्री इतरांच्या आवाक्याबद्दल
आणि हे ही माहीत असते
की जी काही वाटचाल करायची आहे
ती त्या दैवी जांभईचे दिःकालात्म भुयार !



## बत्तीस

बिढारी परंपरेप्रमाणे, दिलीप पु. चित्र्यांना माझ्या अंतःप्रेरणेची रवानगी दुसऱ्या बिढाऱ्याकडेच करणे भाग होते. आणि तूर्त तरी बिढाऱ्यांत अरुण कोलटकर हे एकमेव दुसरे कवी (तिसरे चौथे नव्हेत) असल्याने माझी अंतःप्रेरणा परत कोलटकरांकडे आली. 'मार मला टांग, लाव मला विजेच्या शेंड्या' असे म्हणत कोलटकरांनी संस्कार करायला सुरुवात केली. आणि काय आश्चर्य! खडकांच्या धमन्यात चांदण्या ठसठसवण्याची क्षमता असलेल्या कवितांच्या संस्काराने, इतका वेळ बहिर्लक्षी असणारी माझी अंतःप्रेरणा अंतर्लक्षी होऊन स्थिरावू लागली. कोलटकरांच्या घोड्याच्या ओवीबद्ध टापांचे खणखणीत बोल ऐकल्यानंतर माझ्या अंतःप्रेरणेस आलेले हे आपल्या प्रतिभेच्या घोड्याचे आत्मभान :

### माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा

तो उठतो खिंकाळत वेळी अवेळी
आणि त्याच्या पाषाणशिल्पाइतक्या
अलिप्त काळ्याथंड प्रशस्त नाकपुड्यांतून
निघालेली फुंकर माझ्या दैनंदिन
उकळल्या कढईतून कोरते
शीतल आरामदेह स्विमिंग पूल.
मग तो लगेच गुल होतो गोळा करायला
बिकिनीधारी बायका लोळत ठेवायला
आजूबाजूस चित्राचा एकूण तोल सांभाळायला
न पोहणाऱ्या.

त्याच्या खमक्या टापा टपटपत जातात चौखुर
बिनदिक्कत तुझ्या घरापर्यंत
आणि तुझ्या खोलीच्या खिडकीच्या खाली
तो येऊन उभा रहातो
दोन पायांवर तयार असल्यासारखा
दोन पाय उंचावून तुझ्या खिडकीपर्यंत
सतराव्या मजल्यावरच्या.
(तुझ्या खिडकीला गज असतात ते सोडा.)

तो जमवतो टेंभे तुकतुकीत
मिरवण्यासाठी माझ्या साहेबांसमोर
ज्यांच्या प्रकाशात तो फलकारतो
आपली शेपूट प्रश्नार्थक वारंवार
विचारतो साहेबांना , " आहेत का
माझ्या शेपटीत आहेत तितके तरी केस
तुमच्या आख्ख्या टकलावर मिळून ?"

कधी मधी तो अपनेही घरमें
कुत्र्यासारखा शेर होऊन
एकाच उडीत मला भुईसपाट करीत रक्तबंबाळ
निघून जातो नदीवर
तोंड धुण्यासाठी
पुन्हा येण्यापूर्वी
माझा (पण) बेहद्द नाममात्र घोडा !



## उपसंहार

वास्तविक माझी अंत:प्रेरणा अशी आत्मलक्षी झालेली असताना, प्रस्तुत ग्रंथ यथेच संपूर्ण करण्यास हरकत नव्हती. परंतु आत्मलक्षी झालेली माझी अंत:प्रेरणा एवढ्यावरच थांबली नाही. मी जमा केलेल्या ढिगाचा फडशा पाडीत तळापर्यंत पोचल्यावर माझ्या अंतप्रेरणेस पुढील कविता स्फुरली.

### तो

बाहेर जेव्हा पाऊस
छत्रीछत्रीने भिजत होता
तेव्हा तो चालत आला
–माझ्याच छत्रीतून.

भिजलेला शर्ट
जेव्हा मी काढला
तो बाहेर आला
–माझ्याच शर्टातून.

तोंडावर फेस फासून
दाढी करता करता
जेव्हा मी समोर पाहिले
त्याने मला वेडावून दाखविले
–डाव्या हाताने सेफ्टी रेझर चालवून !

ही कविता लिहून झाल्यावर माझ्या लक्षात आले की ही कविता म्हणजे, ढिगाच्या तळाशी असलेल्या माझ्याच कवितांच्या 'बंच' मधील माझ्याच 'कुर्रे' या कवितेचा माझ्या अंत:प्रेरणेवर संस्कार होऊन मलाच स्फुरलेली नवी कविता !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



## विश्वमोहिनी

### कथासंग्रह

**खेकडा** : दु० आ० / रत्नाकर मतकरी / रु. १८
**हिंदुस्थानातला कावळा** / क. दि. सोनटक्के / रु. १०
**दुर्गी** / सुरेश वेंगुर्लेकर / रु. १५
**निजधाम** / रत्नाकर मतकरी / रु. १५
**दोलाचल** / सुधा नरवणे / रु. १०
**देवयानी** / लता सप्रे / रु. १५
**रंगांधळा** / रत्नाकर मतकरी / रु. २५
**सरणं गच्छामि** / सुधा नरवणे / रु. २०
**हंसकथा भाग १–५** / १ व २ रु. २५ / ३ ते ५ रु. २०
**चिनाब** / श्री. दा. पानवलकर / रु. २०
**भूमी** / आशा दामले / रु. १५
**लांबलचक काळीशार सावली** /
सुभाष भेण्डे / रु. २०
**सोनेरी मनाची परी** / रत्नाकर मतकरी / रु. १०
**आटप, अरे आटप लौकर !** / द. पां. खांबेटे / रु. २५
**यमुनातीरीचे बुलबुल** / कृष्णा जे. कुलकर्णी / रु. १०
**चंद्रावरचा खून** / द. पां. खांबेटे / रु. ३०
**सॉलिटरी क्रीपर्स** / अ. र. कुलकर्णी / रु. ३०
**शेवटचा दिस** ( विज्ञानकथा ) /
यशवंत रांजणकर / रु. ४०
**मृत्युंजयी** / रत्नाकर मतकरी / रु. ३०

### कविता

**स्वस्तिक** ( दु० आ० ) / वसंत सावंत / रु. १५
**देवचाफे** / यशोदा / रु. १२
**तनमनाची गाणी** / यशोधरा साठे / रु. १०
**चंद्रबन** । ग. दि. माडगूळकर । रु. ५०

विश्वमोहिनी, ६२।१२, कर्वे रोड, पुणे ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७०
वा. क्र. २७.३३.०
क्रमांक २५५५
... शाखा (स्थळ प्रत)

## विश्वमोहिनी

### ललित

मुद्रा । पु. भा. भावे । रु. १५
कलावंतांचे आनंदपर्यटन ।
ग. दि. माडगूळकर । रु. १०
सुखाचे दिवस । रमेश मंत्री । रु. २५
स्मरणी । पु. भा. भावे । रु. १५
हिमफुलांच्या देशात । प्रभाकर तामणे । रु. ३०
तीळ आणि तांदूळ । ग. दि. माडगूळकर । रु. ३५
स्वरांच्या बनात । अरविंद गजेंद्रगडकर । रु. १५
नवरंग । रमेश मंत्री । रु. २५
हाय मोगलाई । सिनिक । रु. १०
चषक आणि गुलाब । सुभाष भेण्डे । रु. २५
क्रिकेट-वेध । शिरीष कणेकर । रु. ३५
जत्रा । वसुंधरा पटवर्धन । रु. २५
अष्टचक्री रोमायण । प्रवीण कारखानीस । रु. २०
एका नास्तिकाची तीर्थयात्रा । श्रीपाद जोशी । रु. ३०

### चरित्रे | आत्मचरित्रे

प्रथमपुरुषी एकवचनी । पु. भा. भावे । रु. ४०
मी दासी हिटलरची । पॉलिन कोहलर । रु. १५
रणजी । शंकर अभ्यंकर । रु. १०
वाटेवरल्या सावल्या । ग. दि. माडगूळकर । रु. ४०
प्रथमपुरुषी एकवचनी ( खंड २ ) ।
पु. भा. भावे । रु. ४०

विश्वमोहिनी, ६२।१२, कर्वे रोड, पुणे ४.

REFBK-0024330
REFBK-0024330